## बीचवर मित्राला बांधून तरुणीवर १० जणांचा सामूहिक अत्याचार

**गोपालपूर, दि. १६ प्रतिनिधी**

ओडिशातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या गोपालपूरच्या समुद्रकिनाऱ्यावर मानवतेला काळिमा फासणारी घटना घडली आहे. येथे एका २० वर्षीय महाविद्यालयीन तरुणीवर सामूहिक बलात्कार केल्याची खळबळजनक माहिती समोर आली असून, या घटनेने संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली असून महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणात १० आरोपींचा समावेश असून यापैकी ८ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ही घटना रविवारी संध्याकाळी बेरहामपूर शहराजवळील गोपालपूर बिचवर घडली. पोलिसांच्या माहितीनुसार बीच ही महाविद्यालयीन मुलगी व तिचा मित्र बसले होते. दरम्यान एका निर्मनुष्य ठिकाणी १० अज्ञातांनी त्यांना गाठले व तिच्या मित्राला बांधून घातले या विद्यार्थीनीवर अत्याचार केला. या घटनेनंतर पिडीतेने सोमवारी पोलिसात तक्रार केली. या प्रकरणातील ८ जणांना ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले आहे.


मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

पालघर-ठाणे | रायगड - रत्नागिरी | RNI No.: MAHAMAR/2014/62313 | बुधवार, १८ जून २०२५ | वर्ष: ११ | अंक: २०९ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


**अग्राग्रलेख**

## खरीखरी

### G-7 सोडून ट्रम्प आले

G-7, G-7 आणि G-7, शेवटी कॅनडाने आपल्या पंतप्रधानांना G-7 परिषदेचे निमंत्रण दिले. या G-7 च्या बैठकीतून आज तातडीने लहरी ट्रम्प यांनी घाईघाईत अमेरिका गाठली. इराण आणि इस्रायल यांच्यातील आपापसामधला संघर्ष अत्यंत नाजूक कारणामुळे सुरू झालेला आहे. इराण सध्या अणूबॉम्ब तयार करण्याच्या जवळपास पोचलेला आहे. एक तर त्यांनी तो बनविला असेल किंवा येत्या चार आठ दिवसांमध्ये तो बनवू शकतो. अशी शंका असल्यामुळे इस्राईलने हल्ला केला असावा. तेरा जून रोजी इस्त्राईलने जबरदस्त हल्ला केला. इस्राईलला असे वाटले की आपण एका झटक्यात इराणला शरणागती पत्करण्यास भाग पाडू. रशियाच्या पुतिन यांनाही युक्रेन बाबत असेच वाटले होते. आपण युक्रेन काय फारतर दोन-चार दिवसात ताब्यात घेऊ. मात्र पुतीन यांची आजही दमछाक होत आहे. कारण आज चार वर्षे झाली आहेत. रशियाला युक्रेन सारख्या छोट्या राष्ट्रावर विजय मिळवता आलेला नाही. त्या तुलनेने चिमुकल्या इस्राईल ची तेवढी मोठी शक्ती असू शकत नाही. अमेरिकेत सत्तेवर हुजूर अथवा मजूर या दोन्हीपैकी कोणताही पक्ष असला. तरी अमेरिका इस्राईलला आपल्या दत्तक पुत्रा प्रमाणे आपल्या पप्पा पार्टीचा म्हणजेच शस्त्राचा पुरवठा करीत असतो. अमेरिकेत असलेले बलाढ्य ज्यू उद्योगपती इस्राईलला कधीच वाऱ्यावर सोडू देत नाहीत. इस्त्राईलच्या हल्ल्यानंतर इराणने जो प्रतिहल्ला केला. त्यामुळे इस्राईलचे पंतप्रधान नेत्यान्याहू यांना बंकर मध्ये लपून बसावे लागले आहे. हे सगळ्या जगाने जाणलेले सत्य आहे. कदाचित त्यामुळेच आज ट्रम्प आपला G-7 शिखर संमेलनाचा दौरा अर्धवट टाकून परतले असावेत. त्यानंतर ट्रम्प यांनी आपले शांतीदूताचे आवरण काढून टाकलेले आहे. आता इराणने शरणागती पत्करावी. असा ट्रम्प यांचा इरादा आहे. G-7 शिखर संमेलनातून परत येण्यापूर्वी G-7 च्या संमेलनातूनच इराणवर शाब्दिक हल्ला करण्यात आला. इराण परमाणु बॉम्ब ठेवू शकत नाही असेही सांगण्यात आले. युद्धखोर इस्राईल ने नेहमीप्रमाणे इराणचे मोठे नुकसान केल्याचे दिसत आहे. पण त्याचबरोबर इराणनेही इस्राइलचे कमी नुकसान केलेले नाही. इस्राईलच्या मोसाद नावाच्या जगप्रसिद्ध हेडक्वार्टरवर तसेच त्यांच्या कितीतरी मिलिटरी बिल्डिंगवर जबरदस्त हल्ला केलेला आहे. युद्ध सुरू झाल्यावर दोन्ही पक्ष परस्परांवर जबरदस्त हल्ले करून एकमेकांना नामोहरम केल्याचे सांगत आहेत. त्यामुळे काही म्हटले तरी दोन्ही बाजूचे बरेच मोठे नुकसान झालेले दिसते. तसे पाहिले तर इराण भारताचा अतिशय जुना मित्र आहे. त्या देशाबरोबर भारताचा व्यापार रुपयांमध्ये चालत असतो. त्यामुळे भारताला इराणशी मैत्री ठेवणे भारताच्या फायद्याचे ठरते. त्याचा फायदा भारताला वेळोवेळी मिळालेला सुद्धा आहे. आता गंमत अशी आहे की, G-7 मधील सहा देश शंभर टक्के इस्राईलच्या बाजूने आहेत. त्यामुळे सातव्या भारतालाही इस्राईल ची बाजू घेणे क्रमप्राप्त आहे. ट्रम्प आल्यानंतर आता येत्या एक-दोन दिवसात इराणवर घणाघाती हल्ले होतील. यात शंका वाटत नाही. इराणला दुबळा समजणे इस्राईललाही महागात पडणार आहे. इस्राईलने इराणचे बरेच लष्करी अधिकारी ठार केले आहेत, असे म्हणतात. इराणनेही आक्रमण करण्यास कोतेपणा केलेला दिसत नाही. पण आता शांततेचा झगा घालणाऱ्या ट्रम्पने इराणविरुद्ध आग ओकणे सुरू केले आहे. इराणची अणूकेंद्रे जमिनीच्या बरीच खाली आहेत. असे सांगण्यात येते. अमेरिकेशिवाय इतर कोणालाही त्याचा भेद घेणे शक्य होईल असे दिसत नाही. आता पुढच्या दोन दिवसात कोण कोणावर मात करू शकतो. हे दिसून येईलच. पण आता इराण मध्ये दहा हजार पेक्षा जास्त भारतीय नागरिक अडकलेले आहेत. त्यामधील पंधराशे विद्यार्थी आहेत. त्यातील बहुतेक जम्मू-काश्मीरचे आहेत. त्यांना इराणच्या बाहेर काढणे सोपे नाही. विमानसेवा बंद आहे. तेहरानकडून आर्मेनिया पर्यंत पोहोचायला अकराशे किलोमीटर पेक्षा जास्त अंतर कापावे लागते. विशेष म्हणजे तो प्रवास १३ ते १४ तासांचा असतो. तिकडे इस्राइलमध्येही हजारो भारतीय अडकलेले आहेत. त्यामुळे त्यांनाही बाहेर काढणे गरजेचे आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर या निरपराध भारतीयांचे आपल्या देशात परतणे गरजेचे आहे. आपल्या भारतातील त्यांच्या नातेवाईकांसाठी हे अतिशय महत्त्वाचे आहे. ते कसे परततील हा फारच मोठा यक्षप्रश्न आहे. यातून सरकारलाच मार्ग काढावा लागेल, असे दिसते. येत्या दोन दिवसात परिस्थिती आणखी बिघडू शकते. तेव्हा आता या लढाईचा भारतातील जनमानसावर होणारा परिणाम आणि त्यातून निर्माण होणारी लोकभावना यावर गंभीरपणे विचार करून निर्णय घेणे. हेच आपल्यासाठी अतिशय गरजेचे महत्कार्य आहे.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# शेतीसाठी AI धोरण मंजूर



## आणीबाणीत कारावास भोगलेल्यांचे मानधन दुप्पट

**मुंबई, दि. १७ प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज संपन्न झाली. या बैठकीत 10 मोठे निर्णय घेण्यात आले असून राज्यात शेतीसाठी AI धोरणास मंजुरी देण्यात आली आहे. यासह, आणीबाणीच्या काळात तुरुंगवास भोगलेल्या नागरिकांच्या मानधनात दुप्पट वाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्र कृषि- कृत्रिम बुद्धिमत्ता महाॲग्री-एआय धोरण २०२५ते २०२९ मंजूर करण्यात आलं आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करून कृषि क्षेत्रात परिवर्तन घडविता येणार आहे. त्यामुळे, मंत्रिमंडळ बैठकीतील हा निर्णय शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरेल. यासह, धारावी पुनर्विकास, अनिवासी भारतीयांच्या मुलांच्या शिक्षणाबाबतही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

**राज्य मंत्रिमंडळ बैठकीतील १० मोठे निर्णय**

• ट्रायबल इंडस्ट्रियल क्लस्टरसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास नाशिक जिल्ह्यातील मौजे जांबुटके येथील २९ हेक्टर ५२ आर जमीन. आदिवासी समाजातील होतकरू उद्योजकांना प्रोत्साहन, रोजगार निर्मिती व आर्थिक विकासास चालना मिळणार. (महसूल विभाग)

• एमएमआरडीए आणि मेसर्स रायगड पेण ग्रोथ सेंटर लि. यांच्या संयुक्त प्रकल्पासाठी आवश्यक जमिनीवरील मुद्रांक शुल्कात सवलत. सार्वजनिक, खासगी भागिदारीतून हा राज्यातील पहिलाचा मोठा प्रकल्प. ग्रोथ सेंटरमुळे विदेशी गुंतवणूक आकर्षित होणार. (महसूल विभाग)

• मुंबईतील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठासाठी आवश्यक मौजे पहाडी गोरेगाव येथील जमिनीच्या हस्तांतरणावरील मुद्रांक शुल्क माफ. विद्यापीठाला स्व-मालकीची इमारत मिळणार. हजारो विद्यार्थ्यासाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार. (महसूल विभाग)

• धारावी पुनर्विकास प्रकल्पातील विशेष हेतू कंपनी आणि अन्य यंत्रणा दरम्यानच्या भाडेपट्टा करारावरील मुद्रांक शुल्क माफ. लोकहितार्थ मोठा प्रकल्प असल्याने, पुनवर्सन व पुनर्विकास योजनेला गती लाभणार. योजनेची अंमलबजावणी सुलभ रीतीने होणार. (महसूल विभाग)

• केंद्र सरकारच्या WINDS (Weather Information Network Data System) प्रकल्पाअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची (AWS-Automatic Weather Station) उभारणी करण्यात येणार. यासाठी महावेध प्रकल्पास मुदतवाढ देण्याचा निर्णय. राज्यातील सर्व गावांमध्ये हवामान विषयक अचूक माहिती मिळावी यासाठीचा प्रकल्प. शेतकऱ्यांना हवामानाधारित कृषि विषयक सल्ला व मार्गदर्शनासाठी महत्वाचा प्रकल्प. (कृषि विभाग)

• महाराष्ट्र कृषि- कृत्रिम बुद्धिमत्ता महाॲग्री-एआय (MahaAgri-AI) धोरण २०२५-२०२९ मंजूर. कृषि क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करून परिवर्तन घडविता येणार. कृत्रिम बुद्धीमत्ता, निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धीमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, ड्रोन, संगणकीय दृष्टीक्षमता, रोबोटिक्स, पूर्वानुमान विश्लेषण यांचा वापर करत, राज्यातील ॲग्रीस्टॅक, महा-ॲग्रीस्टेक, महावेद, क्रॉपसॅप, ॲगमार्कनेट, डिजिटल शेतीशाळा, महा-डिबीटी यांसारखे प्रकल्प पुढे नेण्यास मदत होणार. (कृषि विभाग)

• मुंबई मेट्रो मार्ग-२अ, २ ब आणि ७ या मेट्रो प्रकल्पांकरिता एशियन डेव्हलपमेंट बँक व न्यू डेव्हलपमेंट बँक यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या कर्जास मुदतवाढ. (नगरविकास विभाग)

• विरार-अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्प आता "बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा" या तत्त्वावर हाती घेण्यास मान्यता. (सार्वजनिक बांधकाम विभाग).

• आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुप्पटीने वाढ. हयात जोडीदारालाही मानधन मिळणार. गौरव योजनेमध्ये सुधारणा. (सामान्य प्रशासन विभाग).

• अनिवासी भारतीयांच्या मुलांना, पाल्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळणार. विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अनिवासी भारतीयांच्या व्याख्येत बदल. प्रवेश व शुल्क यांचे विनियमन अधिनियम, २०१५ मध्ये सुधारणा. (उच्च व तंत्र शिक्षण विभाग)

## ट्रम्प यांनी G-7 परिषद अर्ध्यावर सोडली

**टोरंटो, दि. १७ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प G7 परिषदेसाठी कॅनडाला पोहोचले होते, परंतु इराण आणि इस्रायलमधील वाढत्या संघर्षामुळे ट्रम्प एक दिवस आधीच परतत आहेत, असे व्हाइट हाऊसने स्पष्ट केले आहे. मला लवकर परतावे लागणार आहे. कारण स्पष्ट आहे," असे ट्रम्प यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. ट्रम्प यांनी उपाध्यक्ष जेडी व्हान्स आणि त्यांचे पश्चिम आशियातील विशेष प्रतिनिधी स्टीव्ह विटकॉफ यांना इराणशी बैठक घेण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, सर्व लोकांनी त्वरित तेहरान सोडावी, असा इशाराही त्यांनी इराणला दिला आहे.




व्हाइट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी कॅरोलिन यांनीएक्स पोस्ट करत म्हटलं की, मध्य पूर्वेतील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर अध्यक्ष ट्रम्प आज रात्री निघणार आहेत.दरम्यान, सोमवारी एका अमेरिकी अधिकाऱ्याने सांगितले की अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प इस्रायल-इराण संघर्ष निवळवण्यासाठी G7 देशांनी तयार केलेल्या निवेदनावर स्वाक्षरी करणार नाहीत.तरीही फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी ट्रम्प यांचे लवकर निघणे सकारात्मक असल्याचे म्हटले आहे, कारण मध्य पूर्वेत युद्धविराम मिळवणे हे उद्दिष्ट आहे. मॅक्रॉन यांनी सांगितले की ट्रम्प यांनी इस्रायल आणि इराणमध्ये युद्धविरामासाठी एक प्रस्ताव दिला आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला इशारा दिला आहे. ट्रम्प यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे की, मी इराणला अणुकरारावर स्वाक्षरी करण्यास सांगितले होते. त्यांनी 'करारावर' स्वाक्षरी करायला हवी होती. त्यांच्या कृतीमुळे संपूर्ण मानवतेला धोका निर्माण झाला आहे. इराणकडे अण्वस्त्रे असू शकत नाहीत. मी हे वारंवार सांगितले आहे. तसेच, भविष्यात आणखी मोठा हल्ल्यांचे संकेत देत ट्रम्प नागरिकांनी तेहरान सोडावे, असा इशारा इराणला दिला आहे.

## इराणचे चीफ ऑफ आर्मी स्टाफ अली शादमानी यांना मारल्याचा इस्राइलचा दावा

**तेहरान, दि. १७ वृत्तसंस्था**



इस्राइल आणि इराण यांच्यात गेल्या शुक्रवारपासून सुरू असलेल्या संघर्षात दोन्ही देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. त्यात इस्राइलने इराणमधील बडे संशोधक आणि लष्करी अधिकाऱ्यांना लक्ष्य करत त्यांची हत्या केली आहे. या संघर्षादरम्यान, आता इराणच्या आणखी एका बड्या लष्करी अधिकाऱ्याची हत्या केल्याचा दावा इस्राइलने केला आहे. इराणच्या सशस्त्र संरक्षण दलांचे नवनियुक्त चीफ ऑफ आर्मी स्टाफ आणि वरिष्ठ सैन्य कमांडर अली शादमानी यांना मारल्याचा दावा इस्राइली संरक्षण दलाने (आयडीएफ) केला आहे. अली शादमानी हे इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांचे निकटवर्तीय सल्लागार होते.

आयडीएफने शादमानी यांच्या मृत्यूबाबत अधिक माहिती देताना सांगितले की, इस्राइली हवाई दलांनी सोमवार आणि मंगळवारदरम्यान रात्री तेहरानमधील सेंट्रल भागात केलेल्या हल्ल्यामध्ये शादमानी हे मारले गेले आहेत. हा हल्ला इस्राइलच्या गुप्तचर विभागाकडून मिळालेल्या अचून माहितीच्या आधारावर करण्यात आला.

शादमानी हे इराणच्या सशस्त्र दलांच्या एमर्जन्सी कमांड आणि खातम अल-अनबिया मुख्यालयाचे कमांडर होते. इस्राइलविरोधातील संघर्षात इराणसाठी युद्धाची रणनीती आखण्यात ते महत्त्वपूर्ण भूमिका बजावत होते, अशी माहितीही इस्राइलने दिली आहे. दरम्यान, १२ जून रोजी इस्राइली सुरक्षा दलांनी ऑपरेशन रायझिंग लायनची सुरुवात केल्यावर सुरुवातीलाच मेजर जनरल गोलाम अली रशिद यांची हत्या केली होती. त्यानंतर शादमानी यांची चीफ ऑफ स्टाफपदी नियुक्ती करण्यात आली होती.

### सरकारी न्यूज चॅनेलच्या इमारतीवर हल्ले



इराणनेइस्रायलमधील संघर्ष दिवसेंदिवस गंभीर वळणांवर पोहोचत असून, दोन्ही बाजूंनी क्षेपणास्त्र हल्ले करण्यात येत आहेत. सोमवारी संध्याकाळी इस्रायलने पुन्हा एकदा इराणवर हवाई हल्ला केला. इस्रायलने इराणची राजधानी तेहरानमधील सरकारी न्यूज चॅनेलच्या इमारतीवर बॉम्ब टाकले. हल्ल्याच्या वेळी एक महिला अँकर लाइव्ह शो करत होती. सुदैवाने ती या हल्ल्यात बचावली. या घटनेचा व्हिडीओही समोर आला असून त्यामध्ये अँकरला स्टुडिओतून पळताना दिसते.

## सुधाकर बडगुजरांचा भाजपात पक्षप्रवेश

**मुंबई, दि. १७ प्रतिनिधी**

शिवसेना ठाकरे गटातून हकालपट्टी गेल्यानंतर नाशिकमधील शिवसेना नेते सुधाकर बडगुजर यांनी अखेर भाजपात प्रवेश केला. गेल्या काही दिवसांपासून भाजपमध्ये सुधाकर बडगुजर व त्यांच्या समर्थकांच्या पक्षप्रवेशाने नाराजीचा सूर पाहायला मिळत होता. तर, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे मकाऊतील कसिनो बारमधील फोटो बडगुजर यांनीची खासदार संजय राऊतांना पुरवल्याचा आरोपही त्यांच्यावर करण्यात आला होता. त्यामुळे, या पक्षप्रवेशाला चंद्रशेखर बावनकुळे हजर राहतील का नाही असा प्रश्न होता. अखेर, मंत्री गिरीश महाजन यांनी एक कॉल केला अन् प्रॉब्लेम सॉल्व्ह झाला. प्रदेशाध्यक्षांच्या उपस्थितीत बडगुजर यांना भाजप प्रवेश झाल्यानंतर,



यापुढे चंद्रशेखर बावनकुळेंचा आदेश तंतोतंत पाळेन, निष्ठेने काम करेन, असे त्यांनी म्हटलं.

आज माझा भाजपात प्रवेश झाला, आदराने प्रवेश झाला. त्यामुळे भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो. गिरीशभाऊ संकटमोचक आहेत, आपत्ती आली की ते मार्ग काढतात आणि त्यांनी माझा मार्ग काढला. आपल्यापर्यंत पक्षापर्यंत काय माहिती दिली हे माहिती नाही. मात्र, मी निष्पाप आहे, असे सुधाकर बडगुजर यांनी भाजपचा गमछा गळयात घातल्यानंतर केला. कोरोना काळात मी काम केलं, कोणी बाहेर येत नव्हतं. मात्र, अचानक नीतीने घाला घातला आणि माझ्यावर कारवाई केली. ज्या पक्षाने कारवाई केली त्यांना सांगू इच्छितो, महापालिका निवडणुकीत दूध का दूध, पानी का पानी होईल. महाराष्ट्रात जो पहिला प्रकल्प सांडपाण्यातून वीज निर्मितीचा केला, तो मुख्यमंत्र्यांनी दिला होता, ते दूरदृष्टीचे नेते आहेत, असे म्हणत बडगुजर यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर स्तुतीसुमने उधळली. गिरीश भाऊ आपण, बावनकुळे साहेब, रविंद्र चव्हाण साहेब जे मार्गदर्शन करणार त्याचे आपण पालन करू, निष्ठेने काम करु आणि परिकाष्ठा करु असे म्हणत सुधाकर बडगुजर यांनी आपलं भाषण संपवलं.

## भाजपसोबत गेलेल्या संधीसाधूंना सोबत घेणार नाही- शरद पवार

**पुणे, दि. १७ प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात राष्ट्रवादी काँग्रेसमधील दोन्ही गट एकत्र येणार असल्याची जोरदार चर्चा सुरु आहे. त्यादृष्टीने वातावरनिर्मितीही झाली होती. परंतु, ज्या शरद पवारांच्या वक्तव्यामुळे ही सगळी चर्चा सुरु झाली त्यांनीच आता या सगळ्या तर्कवितर्कांना ब्रेक लावणारे वक्तव्य केले आहे. जे सत्तेसाठी भाजपसोबत गेले, अशा संधीसाधू लोकांना आपल्याला सोबत घ्यायचे नाही. गांधी, नेहरु, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचे असलेल्यांना सोबत घेऊ, असे शरद पवार यांनी मंगळवारी पुण्यातील एका कार्यक्रमात बोलत होते. शरद पवार यांच्या या वक्तव्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील दोन्ही गट एकत्र येण्याची शक्यता मावळल्याचे संकेत



मिळत आहेत.

या सगळ्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. भाजपसोबत गेलेल्या संधीसाधूंना सोबत घेणार नाही, असे शरद पवारांनी म्हटल्याचे सांगत अजितदादांना प्रतिक्रिया विचारण्यात आली. त्यावर अजित पवार यांनी, 'प्रत्येकाला आपलं मत मांडण्याचा अधिकार आहे', अशी मोघम प्रतिक्रिया दिली. त्यामुळे आता राष्ट्रवादीतील दोन्ही गट एकत्र येण्याच्या प्रक्रियेचं पुढे काय होणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

सगळ्यांना बरोबर घेतलं पाहिजे, असे वारंवार म्हटले जात आहे. पण सगळे म्हणजे कोण? गांधी, नेहरु, फुले, शाहू, आंबेडकर विचारांचे असले तरी त्यांना सोबत घेऊ. पण जे सत्तेसाठी भाजपसोबत गेले, ही भूमिका कोणी मांडत असेल तर हा विचार काँग्रेसचा नाही. कुणाशीही संबंध ठेवा पण भाजपशी संबंध हा काँग्रेसचा विचार असू शकत नाही. त्यामुळे अशा पद्धतीने संधीसाधूपणाचं राजकारण आपल्याला प्रोत्साहित करायचं नाही, त्या दिशेने आपल्याला पावलं टाकायची नाहीत, असे शरद पवार यांनी सांगितले.

आगामी पालिका निवडणुकीसाठी नव्या नेतृत्वाची फळी निर्माण करावी लागणार आहे. या नव्या फळीच्या मार्फत आपल्याला बदल घडवावा लागेल. आज आपल्याला हे चित्र बदलावे लागणार आहे. विकास असा करायचा आहे, ज्यातून भावी पिढीने प्रेरणा घ्यायला हवी. यासाठी संघटन मजबूत करावी लागेल. जे गेले त्यांची चिंता करू नका. मी असे अनेक प्रसंग पाहिले आहेत. माझ्यासोबतच्या अनेक सहकाऱ्यांनी साथ सोडली, पण ज्या-ज्यावेळी असं घडलं, तेव्हा मी चिंताग्रस्त झालो नाही. मला कार्यकर्त्यांनी खंबीर साथ दिली आणि जनतेने पाठिंबा दिला. त्यानंतरही मी सत्तेत आलेलो आहे. त्यामुळे कोण आला, कोण गेला याची चिंता करु नका. लोक शहाणे आहेत, आज ही लोकशाही जनतेच्या शहाणपणाने टिकलेली आहे. ती यापुढं ही टिकून राहणार आहे, असे शरद पवार यांनी म्हटले.

## अहमदाबाद विमान अपघात : कॅप्टन सुमित सभरवाल यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**मुंबई, दि. १७ प्रतिनिधी**

अहमदाबाद येथील एअर इंडियाच्या AI 171 या विमान अपघातात कॅप्टन सुमित सभरवाल मृत्युमुखी पडले होते. त्यांचे पार्थिव आज पवईत आणण्यात आले. सुमित सभरवाल हे या विमानाचे मुख्य वैमानिक होते. ते एअर इंडियात लाईन ट्रेनिंग कॅप्टन या पदावर काम करत होते. पवईतील जलवायू विहार संकुलात ते वास्तव्यास होते.



एक अधिकाऱ्याने सांगितलं की, कॅप्टन सभरवालचे पार्थिव सकाळी विमानाने मुंबई एअरपोर्ट येथे पोहोचले. तेथून त्यांचे कुटुंबातील सदस्य पार्थिव पवईतील जलवायु विहार येथील निवासस्थानी घेऊन गेले.

तसेच 'एअर इंडिया'च्या सीनियर ग्रुप मेंबर श्रद्धा ढवळ श्रद्धा धवन यांचे पार्थिव रात्री मुलुंड येथील कल्पतरू या राहत्या घरी आणण्यात आले. यावेळी हजारो लोकांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. एअर इंडियामध्ये त्या सीनियर ग्रुप मेंबर म्हणून कार्यरत होत्या. १२ जून रोजी लंडनला जाण्यापूर्वी त्यांनी कुटुंबीयांना फोन करून लवकरच भेटू असे सांगितले होते. दुर्दैवाने काही वेळातच त्यांच्या विमानाचा अपघात झाला आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. मुलुंड येथील कल्पतरू या इमारतीत त्या राहत होत्या. रात्री उशिरा त्यांचा पार्थिव घरी आणण्यात आला.

श्रद्धा धवन यांच्या परिवारात तिचे पती, आई-वडील आणि एक मुलगी आहे. मुलगी इयत्ता १० वीमध्ये शिकत आहे. पती देखील एयर इंडियामध्ये कार्यरत आहत. विमान अपघातानंतर श्रद्धाचे पार्थिव ओळखणेही कठीण झाले होते. डीएनए तपासाच्या माध्यमातून ओळख पटवण्यात आली.

## मंगेश शेनाय स्ट्रीट वरील कचऱ्याचे ढिगारे तसेच पडून

## स्थानिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

**मुंबई दि. १७ प्रतिनिधी**

पावसाळ्यामध्ये कचऱ्याची समस्या नेहमीच असते. आपल्या मुंबई महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन खाते अत्यंत ॲक्टिव्ह आहे. यात कोणाच्याही मनात शंका नाही. गेल्या दोन दिवसात मुंबई शहरासह इतर ठिकाणी चांगल्या प्रमाणात पाऊस झाला. मुंबई नंबर-१ विशेषता फोर्ट परिसरात साफसफाई अत्यंत वाखाणण्यासारखी असते. कारण महानगरपालिकेचे मुख्यालय याच ठिकाणी आहे. या विभागातील मुख्य रस्ते अगदी चकाचक असतात. मात्र बोरा बाजार, बजार गेट आणि बोरा बाजारच्या बाजूला लागूनच असलेला मंगेश शेनाय स्ट्रीट या ठिकाणी रस्त्यावर पडणाऱ्या कचऱ्याची व्यवस्था गेले काही दिवसापासून नीट करण्यात येत नाही. भल्या सकाळी पालिकेचे घनकचरा व्यवस्थापन खाते आणि त्यामध्ये कार्यरत असलेले कामगार अत्यंत मेहनतीने साफसफाईचे काम करतात. झाडू मारणारे कर्मचारी प्रत्येक गल्ली मधून आणि छोट्या छोट्या रस्त्यांवरून कचऱ्याची जागोजागी ढिग जमा करत असतात आणि तो कचरा पालिकेच्या कचरा पेट्यांमधून उचलला जातो. हे काम साधारणपणे सकाळी नऊ पर्यंत पूर्ण होत असते. मात्र कधी कधी जमा केलेला कचरा उचलण्याकडे संबंधित विभागातील कचरा व्यवस्थापनाशी निगडित



असलेल्या काही कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे तो कचरा दिवसभर तिथेच पडून राहतो. सकाळी नऊ नंतर त्याच कचऱ्यावर वाहने पार्क केली जातात. त्यामुळे तो कचरा पुन्हा उचलता येत नाही. आता पावसाळा सुरू झाला आहे त्यामुळे साथीचे विविध आजार अस्वच्छतेमुळे आणि घाणीच्या साम्राज्यामुळे होत असतात. याबाबत पालिका प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांनी नीट लक्ष देऊन हे काम करून घेण्याची गरज आहे.

मंगेश शेनाय स्ट्रीट म्हणजेच होलीचकला येथील कचरा जमा करून ठेवलेल्या ढिगाऱ्यांचे काही फोटोज या ठिकाणी पाठवले आहेत. वर्तमानपत्रात झळकलेले फोटो पाहून तरी वॉर्ड ऑफिसर ए वॉर्ड आणि नगरपालिकेच्या कचरा व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी याची योग्य ती दखल घ्यावी. आजचा प्रकार पाहून येथील नागरिक प्रचंड संतप्त झालेले आहेत. न उचलल्या गेलेल्या या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे येथील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. एखाद्या छोट्याशा गल्लीमध्ये 8 ते 10 ढिगारे उचलण्याविना तसेच पडून राहत असतील. तर पालिका प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यायला हवी.


(संबंधित बातमीचे उर्वरित फोटो पान ८ वर)

# मोकाट श्वानांवर निर्बिजीकरण, लसीकरण

**भाईंदर, दि. १७ : प्रतिनिधी**

अनिमल बोर्ड ऑफ इंडियाच्या निर्देशानुसार मीरा भाईंदर महापालिका हद्दीतील मोकाट श्वान आणि मांजरांवर निर्बिजीकरण आणि लस्सीकरण प्रकल्प उत्तन येथील शिरे गावठण, मराठी शाळेजवळ सुरु करण्यात आला आहे. त्याचा ठेका मे. प्रतापराव राणे एज्युकेशन अँड चॅरिटेबल ट्रस्टला देण्यात आला आहे.

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील मोकाट श्वानांवर व मांजरावर 100% निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण प्रस्तावित असून आपल्या कार्यक्षेत्रातील निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण न झालेल्या श्वानांची व मांजरांची माहिती मे. प्रतापराव राणे एज्युकेशन अ‍ॅण्ड चॅरिटेबल ट्रस्ट, यांना मो. नं. 8976835431 वर देण्यात यावी, असे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात आले आहे..

यापुर्वी मोकाट श्वानांवर व मांजरावर निर्बिजकरण व शस्त्रक्रिया केलेल्या श्वानांच्या उजव्या बाजुच्या कानावर V आकाराचे चिन्ह करण्यात आलेले आहे. ज्या श्वानांच्या उजव्या बाजुच्या कानावर V आकाराचे चिन्ह नसेल अशा श्वानांची माहितीवरील भ्रमणध्वनी क्रमांकावर देण्यात यावी जेणेकरून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील श्वानांवर / मांजरांवर 100% निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण शक्य होईल, असेही महापालिकेकडून सांगण्यात आले आहे.

सदरचे काम अनिमल बोर्ड ऑफ इंडियाच्या निर्देशानुसार करण्यात येत असुन प्राणी प्रेमी संघटना व इतर व्यक्ती यांचेकडुन मोकाट श्वान, मांजर पकडणे किंवा सोडण्याचा ठिकाणी तसेच ह्या संबंधित कामाबाबत अडथळा करण्यात येउ नये, अन्यथा संबंधितावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# वसईच्या नायब तहसीलदारांच्या कारभाराविरोधात सर्वपक्षीय एकवटले

## उपविभागीय अधिकाऱ्यांचे कारवाईचे निर्देश

**वसई, दि. १७ : प्रतिनिधी**

वसई तहसीलदार कार्यालयामध्ये कार्यरत असलेले नायब तहसीलदार शशिकांत नाचण यांच्याविरोधात विविध पक्षाचे पदाधिकारी , सामाजिक संघटना यांनी लेखी निवेदन मंगळवारी सकाळी प्रांताधिकाऱ्यांना दिले. सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरून जाणीवपूर्वक नागरिकांची कामे प्रलंबित ठेवल्याप्रकरणी, पुरवठा विभागाचा तात्पुरता कार्यभार असताना संशयास्पद शिधापत्रिका मंजूर केल्याची प्रकरणे, नवीन कार्यभार स्वीकारणाऱ्या तलाठ्यांना डीएलसीची पूर्तता हेतू पुरस्सर करून न देणे असे गंभीर आरोप निवेदनातून करण्यात आले आहेत.

नायब तहसीलदार नाचण हे अभ्यंगताना उद्धट व अरेरावेची भाषा करतात जाणीवपूर्वक कामे खोळंबून ठेवतात. मागील अडीच वर्षांपासून त्यांच्याकडे प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे प्रलंबित कामाची झाड झडती घेण्यात यावी, स्थानिक भूमिपुत्रांनी त्यांच्या जमिनीच्या कामासंदर्भात योग्य दस्तावेज देऊनही जाणीवपूर्वक कामे केली जात नाहीत. बिल्डर लॉबीशी आर्थिक व्यवहार



> वसई तालुक्यातील तलाठ्यांना पदभार दिलेला आहे. तसेच डीएलसी प्रक्रिया पूर्ण केली आहे.
>
> **- शशिकांत नाचण, नायब तहसिलदार**
>
> दालनाचे दरवाजे काढण्यात येतील. वातानुकूलित यंत्रे यापुढे त्यांना वापरता येणार नाही. तसेच खाजगी इसम कामकाजासाठी असल्यास त्यांच्यावरही निर्बंध आणले जातील.
>
> **- शेखर घाटगे, प्रांताधिकारी**

करून आपल्या पदाचा गैरवापर केल्याप्रकरणी कारवाईची मागणी शिष्टमंडळाने उपविभागीय अधिकारी वसई यांच्याकडे केली आहे.

'वरिष्ठांना तक्रार केली तरी आपल्याला फरक पडत नाही' असा पावित्रा घेणाऱ्या नाचण यांच्यावर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश यावेळी उपविभागीय अधिकारी शेखर घाडगे यांनी उपस्थित असलेले तहसीलदार अविनाश कोष्टी यांना दिले. सदर निवेदनानुसार नाचण यांच्यावर कारवाई करून त्यांची तात्काळ बदली करण्याची मागणीही सदर निवेदनात करण्यात आली आहे.

याबाबत येत्या पंधरा दिवसात कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालय व पालकमंत्री गणेश नाईक यांच्या जनता दरबारात काळे झेंडे दाखवून कारवाई करणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे. याशिष्टमंडळात मनसे तालुका उपाध्यक्ष प्रशांत धोंडे, युवक काँग्रेस अध्यक्ष कुलदीप वर्तक, ठाकरे गटाचे विभाग प्रमुख दत्ता जाधव, सामाजिक कार्यकर्ते संजय कदम, एलायस डिसिल्वा,भाजपा उपाध्यक्ष निलेश वर्तक इत्यादी राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# पेटीट रुग्णालयाच्या नवीन विस्तारीत इमारतीचे मुख्यमंत्र्यांचे हस्ते लोकार्पण

**वसई, दि. १७ : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वसई विरार महापालिकेच्या सर डी. एम. पेटीट रुग्णालयाच्या विस्तारित इमारतीचे लोकार्पण ऑनलाईन पध्दतीने करण्यात आले.

सर डी.एम.पेटीट रुग्णालयाच्या या नवीन विस्तारित इमारतीत रुगांच्या सेवेसाठी विविध प्रकारच्या वैद्यकीय सेवा-सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या नवीन इमारतीत रुग्ण नोंद विभाग, २५ बेडचे प्रसुतीपूर्व विभाग (ANC Ward), २५ बेडचे प्रसुती पश्चात विभाग (PNC Ward), १५ बेडचे NICU विभाग, ५ बेडचे बालरोग विभाग, गरोदर माता तपासणी ANC OPD, बालरोग तपासणी, शस्त्रक्रिया विभाग, नवजात बालक लसीकरण विभाग, औषध विभाग (Pharmacy), सोनोग्राफी विभाग, जन्म दाखला नोंदणीकरण



विभाग इत्यादी विभाग रुग्णांच्या सेवेसाठी सुरु करण्यात आले आहेत.

सर डी.एम.पेटीट रुग्णालय हे नागरिकांना आरोग्य सेवा पुरवणारे वसईतील अग्रगण्य व जुने रुग्णालय आहे. रुग्णालयात दरमहा सरासरी ८ हजार ते १० हजार रुग्ण जनरल ओ.पी.डी.मध्ये उपचार घेत असतात. तसेच मासिक सरासरी ५०० ते ५५० आंतररुग्ण दाखल होतात. त्यापैकी २५० ते ३०० प्रसुती, व १०० ते १५० लहान-मोठ्या शस्त्रक्रिया होत असतात. रुग्णालयातील वाढती रुग्णसंख्या लक्षात घेता रुग्णालयाचे विस्तारीकरण करणे आवश्यक असल्याने आयुक्त तथा प्रशासक अनिलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जुन्या रुग्णालयाच्या मागील बाजूकडील जागेत नवीन इमारत बांधण्यात आली. रुग्णालयाच्या नवीन विस्तारीत इमारतीमुळे अधिकाधिक रुग्णांना वैद्यकीय सेवा देणे शक्य होणार आहे.

# नाट्यगृहाला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव द्या; शिवसेना ठाकरे गटाची मागणी

**वसई, दि. १७ : प्रतिनिधी**

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'डी' अंतर्गत निर्माणाधिन नाट्यगृहाला महाराष्ट्राची अस्मिता व अभिमान असलेल्या आदरणीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव द्या, अशी मागणी वसई-विरार महापालिका स्थायी समितीचे माजी सदस्य तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपजिल्हाप्रमुख किशोर पाटील यांनी केली आहे. या नाट्यगृहाच्या निमित्ताने वसई-विरार आणि नालासोपारा शहरातील रसिक प्रेक्षकांना मनोरंजनाचे व्यासपीठ उपलब्ध होणार असल्याने शहरवासीयांना या नाट्यगृहाची आत्यंतिक प्रतिक्षा आहे. सदर नाट्यगृहाचे पूर्ण होताच; समस्त महाराष्ट्राची अस्मिता व अभिमान असलेल्या आदरणीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव या नाट्यगृहास दिले जावे. या नामकरणामुळे समस्त महाराष्ट्राला प्रेरणा, ऊर्जा आणि चैतन्य प्राप्त होईल, असा आशावाद त्यांनी या निवेदनातून व्यक्त केला आहे. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'डी' अंतर्गत मजेठिया नाट्यगृहाच्या कामाकरता ठराव क्रमांक 239 दि. 17 जून 2021 अन्वये संविदा मंजूर करण्यात आलेली होती. मात्र सहा वर्षांपासून या कामाला गती मिळालेली नव्हती. या नाट्यगृहाचे काम तातडीने पूर्ण व्हावे, यासाठी 24 मार्च 2025 रोजी किशोर नाना पाटील यांनी वसई-विरार महापालिकेसोबत पत्रव्यवहार केलेला होता. त्यावर मे 2025 अखेर या नाट्यगृहाचे काम पूर्ण होईल, असे महापालिका सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कळवण्यात आलेले होते. मंजूर अंदाजपत्रकात साउंड सिस्टिम, सेंट्रल एसी व अग्निशमन यंत्रणा उभारणीसाठी आवश्यक बाबींचा समावेश केला नसल्याने या नाट्यगृहाचे काम सर्वार्थीने पूर्ण होऊ शकलेले नाही, असा खुलासा बांधकाम विभागाने त्यावेळी केला होता. मात्र नाट्यगृहाच्या कामातील विलंबामुळे वसई-विरार शहरातील रसिक प्रेक्षकांना मनोरंजनापासून वंचित राहावे लागत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केलेली होती. नाट्यगृहाचे काम तातडीने पूर्ण करून त्याचे लोकार्पण करण्यात यावे, अशी मागणी किशोर पाटील यांनी केली होती. सध्या या नाट्यगृहाचे काम अंतिम टप्प्यात आहे. या पार्श्वभूमीवर या नाट्यगृहाला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव द्या, अशी मागणी किशोर पाटील यांनी केली आहे.

# दिव्यांग झोपडपट्टीधारकांना हक्काची घरे; आयुक्तांकडून चाव्या सुपूर्द

**भाईंदर, दि. १७ : प्रतिनिधी**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील आरक्षण क्रमांक ३०० (खेळाचे मैदान) येथे राहणाऱ्या दिव्यांग झोपडपट्टीधारकांसाठी एक महत्त्वाचा टप्पा गाठण्यात आला. मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा यांच्या उपस्थितीत आणि शहर अभियंता दिपक खांबित यांच्या मार्गदर्शनाखाली, कक्कड हाऊसिंग या पुनर्वसन प्रकल्पात चार दिव्यांग लाभार्थ्यांना नव्या सदनिकांच्या चाव्या वाटप करण्यात आल्या.

आरक्षण क्रमांक ३०० हा भूखंड, मिरा-भाईंदर शहर विकास आराखड्यानुसार "खेळाचे मैदान" या सार्वजनिक आरक्षणात येतो. याठिकाणी २९ झोपडपट्टीधारक अनेक वर्षांपासून वास्तव्यास होते. त्यापैकी १७ नागरिक हे दिव्यांग होते. सदर जागा विकास आराखड्याप्रमाणे खेळाच्या



मैदानासाठी निश्चित करण्यात आली असल्याने, येथे वास्तव्यास असलेले झोपडपट्टीधारक बाधित ठरले. विशेष म्हणजे, या बाधित वस्तीतील दिव्यांग नागरिकांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया संवेदनशीलतेने आणि प्राधान्याने राबवली गेली.

महानगरपालिकेने दिव्यांग हितधारकांच्या पुनर्वसनासाठी स्वतंत्र प्रशासकीय ठराव मंजूर केला होता. त्यानुसार, पुनर्वसन प्रकल्पाअंतर्गत 'कक्कड हाऊसिंग' याठिकाणी सदनिकांची व्यवस्था करण्यात आली असून, त्याचे चाव्यांचे वाटप करण्यात आले. यामध्ये लाभार्थी बाबाजी भिसे, शोभा चव्हाण, सुवर्णा जाधव आणि तरन्नुम अन्सारी यांना आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा यांच्या हस्ते त्यांच्या नव्या घराच्या चाव्या देण्यात आल्या.

या उपक्रमामुळे दिव्यांग नागरिकांना त्यांच्या हक्काचे घर प्राप्त झाले असून, त्यांच्या जीवनात स्थैर्य, सुरक्षितता आणि आत्मसन्मान निर्माण झाला आहे. मिरा-भाईंदर महापालिका विविध सामाजिक घटकांच्या पुनर्वसनासाठी यापुढेही अशाच प्रकारचे योजनाबद्ध कार्य करत राहील आणि उर्वरित बाधितांना लवकरच सदनिका वाटप करण्यात येणार असल्याचे आयुक्त शर्मा यांनी सांगितले.

# तलासरीत पावसाने घराची पडझड

**तलासरी, दि. १७ : प्रतिनिधी**

रविवारी रात्रीपासून तलासरी तालुक्यात वादळी वाऱ्यासह विजेचा कडकडाट आणि मुसळधार पाऊस सुरू आहे. या नैसर्गिक आपत्तेमुळे मौजे कवाडा पाटीलपाडा येथील मनोज वसंत ठाकरे यांचे घर सोमवार (दि. १६ जून) सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास चिंचेचे झाड कोसळून पूर्णतः उद्ध्वस्त झाले. या दुर्घटनेत सुदैवाने जीवितहानी टळली असली, तरी ठाकरे कुटुंबाचे आर्थिक नुकसान अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहे. झाड कोसळल्यामुळे घरावरील १० पत्रे पूर्णपणे तुटली असून,



घरात असलेले किराणा दुकान आणि त्यातील संपूर्ण साहित्य पावसात भिजून खराब झाले. दरम्यान, घटनेनंतर ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन झाड हटवण्याचे काम दुपारपर्यंत पूर्ण केले. मात्र, या कालावधीत आपत्ती व्यवस्थापन किंवा महसूल विभागाचा एकही प्रतिनिधी घटनास्थळी पोहोचला नाही, ही बाब अत्यंत खेदजनक

> प्रशासनाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करून नुकसानभरपाई दिली पाहिजे. सरकारने लक्ष घालावे, आणि प्रशासनातील निष्क्रीय अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, ही आमची मागणी आहे.
>
> **- मनोज वसंत ठाकरे , घरमालक**

आणि संतापजनक आहे. ठाकरे कुटुंबाच्या सांगण्यानुसार, संबंधित तलाठ्यांशी संपर्क साधण्यात आला असता त्यांनी "फोटो पाठवा, पंचनामा करू" असे निव्वळ औपचारिक उत्तर दिले. प्रत्यक्षात मात्र, पंचनाम्याची कोणतीही प्रक्रिया सुरू करण्यात आलेली नाही. हे प्रशासनाच्या बेजबाबदार आणि निष्क्रीय वर्तणुकीचे प्रत्यक्ष उदाहरण आहे. एकीकडे घराचे छप्पर गेले, संसार उघड्यावर आला आणि दुसरीकडे प्रशासन मात्र कागदोपत्री प्रक्रिया आणि 'फोटो पाठवा' या उथळ पातळीवर अडकले आहे.

या घटनेतून स्थानिक आपत्कालीन यंत्रणांची कमकुवत तयारी आणि महसूल विभागातील कर्मचाऱ्यांचा ढिसाळपणा प्रकर्षाने दिसून आला आहे. संकटग्रस्त कुटुंबाकडे वेळेवर धाव न घेणे ही केवळ हलगर्जी नाही, तर त्यांच्या पदाचा गैरवापर आणि जबाबदारीपासून पळ काढण्याचाच प्रकार आहे.

## माहिती अधिकार अपिलांवरील सुनावणी कोकण खंडपीठात सर्वसामान्यांसाठी खुली

**मुंबई, दि. १७ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाच्या कोकण खंडपीठाने माहिती अधिकार अधिनियमांतर्गत दाखल केलेल्या अपिलांवरील सुनावणी आता सर्वसामान्यांसाठी खुली केली आहे. त्यामुळे माहिती अधिकार प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येण्यास मदत होईल, असा विश्वास कोकण खंडपीठाचे राज्य माहिती आयुक्त शेखर चन्ने यांनी व्यक्त केला आहे. राज्य माहिती आयोगाच्या 6 ऑक्टोबर 2023 रोजी झालेल्या बैठकीत माहिती अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 15(4) नुसार अपिलांवरील खुल्या सुनावणीस मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार, कोकण खंडपीठातील राज्य माहिती आयोगाच्या दालनात होणाऱ्या द्वितीय अपिलांवरील सुनावण्या 16 जून, 2025पासून सर्वसामान्यांसाठी खुल्या करण्यात आल्या आहेत. खुल्या सुनावणीस उपस्थित राहण्यासंदर्भात काही अटी व शर्ती निश्चित करण्यात आल्या आहेत. प्रत्यक्ष सुनावणीमध्ये फक्त अपीलकर्ता/तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनाच बोलण्याची किंवा सहभाग घेण्याची परवानगी असेल. उपस्थित इतर व्यक्तींना किंवा नागरिकांना सुनावणी प्रक्रियेत थेट बोलण्याची किंवा त्यात सहभाग घेण्याची परवानगी नसेल. त्यांची उपस्थिती केवळ अभ्यागत (Visitors) म्हणून असेल. त्यांनी राज्य माहिती आयुक्त किंवा पीठासीन अधिकाऱ्यांचा सन्मान राखणे बंधनकारक असेल. अपीलकर्ता किंवा त्यांचे प्रतिनिधी, प्रतिवादी किंवा त्यांचे प्रतिनिधी आणि इतर सर्व व्यक्तींना त्यांचे भ्रमणध्वनी बंध ठेवणे बंधनकारक असेल. सुनावणी प्रक्रियेचे ध्वनिचित्र मुद्रण करता येणार नाही. अपील किंवा तक्रारीसंदर्भातील प्रकरणांत व्यक्तिगत माहितीचा समावेश असल्यास अशा प्रकरणांमध्ये राज्य माहिती आयुक्त किंवा पीठासीन अधिकारी त्रयस्थ व्यक्तींना प्रवेश नाकारू शकतील.

# वसई-अर्नाळा राज्यमार्गाची दुरवस्था; रस्ता दुर्लक्षित राहिल्याने अनेक समस्या

**वसई, दि. १७ : प्रतिनिधी**

वसई तालुक्यातील वसई-अर्नाळा राज्यमार्ग अतिशय महत्वाचा मानला जातो. आजही वसई पश्चिमेकडील वसई ते अर्नाळा दरम्यान जोडणारा हा एकमेवच मार्ग आहे. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून दुर्लक्षित वसई-अर्नाळा राज्यमार्ग अनेक समस्यांच्या विळख्यात सापडून त्याची पार दुरवस्था झाली आहे. परिणामी गावकऱ्यांसह वाहनचालकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. म्हणूनच यामार्गावरील समस्या दूर कराव्यात अशी मागणी समाजवादी पक्षाचे उपाध्यक्ष पायस मच्याडो यांनी केली आहे.

वसई-अर्नाळा राज्य महामार्ग हा गेली अनेक वर्षे दुर्लक्षित असा महामार्ग झालेला आहे. हा महामार्गावर सद्या प्रचंड प्रमाणात वाहतूक होत आहे. परंतु ज्या स्थितीत तो गेली अनेक वर्षे आहे त्यामध्ये काहीही बदल झालेला नाही. रस्ता डागडुजी, गटारव्यवस्था, रस्ता रूंदीकरण केले गेलेले नाही. सदर रस्त्यावर अनेक ठिकाणी अतिक्रमणे झाली असल्याने रस्ता खूप ठिकाणी अंरूद झाला आहे. रस्त्यावर अनधिकृतपणे वाहने ठेवली जात असतात. ह्यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी होत असून अनेकवेळा जीवघेणे अपघात होऊन जीव व वित्तहानी होत आहे, अशी मच्याडो यांची तक्रार आहे. .

भरीस भर म्हणून सद्या अनेक ठिकाणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व इतर माध्यमातून पाणी पुरवठा पाईपलाईन टाकली जात आहे. तसेच अनेक नेटवर्क कंपनीच्या केबल टाकण्याचे काम सुरु आहे. त्यासाठी मोट्या प्रमाणावर रस्ता खोदलेला आहे. रस्त्याचे डांबरीकरण झालेला आहे त्याच्यात कुठेही लेव्हल नाही. अनेक ठिकाणी खड्डे पडलेले आहेत किंवा उंचवडा निर्माण झालेला आहेत. परिणामी दुचाकी वाहन चालवताना अपघात होण्याची भीती आहे. म्हणूनच हा रस्ता संपूर्णतः नव्याने एक पातळीमध्ये म्हणजे लेवलमध्ये बनवण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात. अन्यथा होणाऱ्या दुर्घटनेला आपण जबाबदार असाल, याची नोंद घ्यावी, असा इशाराही मच्याडो यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिला आहे.

रस्त्यावर गॅरेज्स, हॉटेल, दुकाने यांच्यासमोर वाहने उभे असतात. निर्मळ नाक्यावर रिक्षा स्टँड तयार केलेला आहे. त्यामुळे तिथे नेहमीच वाहतूक कोंडी असते. तेव्हा सदर रिक्षा स्टॅन्ड तिथून हलवावे व जिथे जास्त रुंद रस्ता आहे, तेथे रिक्षास्थानाचे पुनर्वसन करावे, अशी मच्याडो यांनी सूचना केली आहे.


## प्रेसनोट

विभागीय आयुक्त कार्यालयासाठी विधी अधिकारी हे पद करार (कंत्राटी) पध्दतीने भरणेबाबतची जाहीरात व अर्जाचा नमुना विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचे संकेतस्थळ divcomkonkan.gov.in यामध्ये प्रकाशने (प्रेस रिलीज) संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज दिनांक २५.०६.२०२५ पर्यंत विहित कागदपत्रांच्या स्वस्वाक्षांकित प्रतीसह konkancomissioner.lawofficer@gmail.com या ईमेल वर कार्यालयीन वेळेत दाखल करावेत. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२२-२७५७१५१७ वर संपर्क साधावा.

सही/-
(डॉ. विजय सूर्यवंशी)
विभागीय आयुक्त, कोकण विभाग

डी.जी.आय.पी.आर.आरओसी २०२५-२६/क्र-५/C१२०१



**जाहीर नोटीस**
**तहसीलदार तलासरी यांचे कोर्टात,**
**महाराष्ट्र कुळवहीवाट व शेतजमीन अधिनियम, कलम ७०, ब**

श्री. कृष्णा नवल्या शिंदा,
रा. उधवा, ता. तलासरी, जि. पालघर ४०१६०६ ----------अर्जदार

**विरुध्द**

श्री. दिलीपभाई बाबूभाई शहा,
रा. सुपुष्पा बंगला, मालाणी,
जी.आय.डी.सी., वापी, ता. वापी, जि. वलसाड ----------सामनेवाला

**जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं/हि.नं | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| उधवा | ३६/१/ड | ३.३२.०० | १.५ |

या जमिनी संबंधी मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७०ब अन्वये वरील अर्जदार याने या न्यायालयात दावा क्र. २४/२०२४ दाखल केला होता. सदर दाव्यांच्या सुनावणीसाठी तारीख दि.०४.०६.२०२५ निश्चित करण्यात आली होती व सदर जमीन मालकाची नोटीस, पोस्टाने पाठविण्यात आली असता, पत्त्याच्या ठिकाणी राहत नाही, असा शेरा मारुन पोस्टाने परत आली. अर्जदार यांना जमीन मालकाचा सध्याचा पत्ता माहीत नसल्याचे व त्यांनी वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याकामी विनंती केली आहे. सबब या नोटिसीद्वारे सामनेवाले यांस कळविण्यात येते की, ७/१२ उताऱ्यावरील नोंदीनुसार ते या मिळकतीचे एक हितसंबंधित असल्याने त्याने अथवा या मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही हितसंबंध असल्यास दिनांक ०२.०७.२०२५ रोजी सुनावणी कार्यालयात हजर राहून आपले म्हणणे समक्ष दाखल करावे. जर कोणी हितसंबंध दर्शविले नाही, तर सामनेवाले यांना अथवा अन्य कोणीही व्यक्तीचा हितसंबंध नाही व दाव्याकामी काही एक सांगावयाचे नाही, असे गृहीत धरून दाव्यांची सुनावणी एकतर्फी पूर्ण करून निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी. माझ्या सही शिक्क्याने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे.

**ठिकाण : तलासरी**
**दिनांक : ०६-०६-२०२५**

प्रत- १. ग्राम महसूल अधिकारी उधवा
२. ग्रामपंचयात अधिकारी उधवा
२-/ सदरी नोटीस आपल्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करून नोटीस प्रसिद्ध केलेबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सही/-
तहसिलदार तलासरी



## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व) कुळगांव, पिन-४२१५०३, ता.अंबरनाथ जि.ठाणे.
ईमेल:- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in. वेबसाईट:- https://kbmc.gov.in

**जा.क्र : कुबनप/उद्यान/९३/२०२५-२६** **दिनांक:- १७/०६/२०२५**

**वृक्षप्राधिकरण विभाग**
**जाहीर सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ कलम ८ (३) क मधील तरतुदीनुसार, सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, खालील नमूद वृक्ष काढणे/ पुनर्रोपण करणे बाबतचे अर्ज वृक्ष प्राधिकरण विभागात प्राप्त झालेले असून अर्जाबाबत हरकती व सूचना मागविण्यात येत आहेत. संबंधित अर्ज व इत्तर तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | अर्जदार | विकासकामात बाधित होत असलेली झाडे |
|---|---|---|
| १ | नगर अभियंता कुळगाव बदलापूर नगरपरिषद | कुबनप हद्दीतील विविध चौकाचे फॅनिंग करणे कामात डी. जी. वन महाराणा प्रताप महाराज चौक- ३ झाडे, मॅक्डोनाल्ड जवळ कात्रप ३ झाडे, रमेशवाडी-समर्थनगर चौक-२ झाडे, समर्थ चौक हेंद्रेपाडा रोड-५ झाडे बाधित होत आहे. |

उपरोक्त प्रस्तावाविषयी आक्षेप व सूचना असल्यास सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात मुख्याधिकारी तथा वृक्ष अधिकारी कुळगांव बदलापूर नगरपरिषद नवीन प्रशासकीय इमारत कुळगांव येथे देणेत याव्यात, तसेच मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सूचनाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
(मारूती गायकवाड)
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद
कुळगांव

# सुधाकर ते सुधारक?



**मुंबईतल्या १९९३ च्या बॉम्बस्फोटातील आरोपी सलीम कुत्तासोबत ठाकरे गटाच्या शिवसेनेचे सुधाकर बडगुजर यांनी पार्टी केल्याचा आरोप भाजप आमदार नीतेश राणे यांनी विधिमंडळात केला होता. या पार्टीचे फोटोही सभागृहात दाखवले होते. विशेष म्हणजे या आरोपानंतर तत्कालीन गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एसआयटी स्थापन केल्याची घोषणा केली होती. आता त्याच बडगुजरांना भाजपने पायघड्या टाकल्यात. नीतेश राणे त्यासाठी हिंदुत्वाचा मुलामा देत आहेत.**

-------------

भाजपने या सुधाकरला सुधारक करण्याचा विडा उचलला आहे. उद्या सलीम कुत्ता सुद्धा भाजपसोबत येऊन मॅटर क्लोज करू शकतो, अशा शब्दांत ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी भाजपला खडेबोल सुनावलेत.

सुधाकर बडगुजर १९९३ च्या बॉम्बस्फोटातील आरोपींसोबत काय करत होते? असा प्रश्न दोन वर्षांपूर्वी भाजप आमदार नीतेश राणे यांनी विधिमंडळात उपस्थित केला होता.

बॉम्बस्फोटातील आरोपींसोबत सुधाकर बडगुजर यांनी पार्ट्या झोडल्या आहेत, असा आरोप तो फोटो दाखवत नीतेश राणेंनी करत गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे चौकशीची मागणी केली होती. त्यावर मंत्री दादा भुसे आणि भाजप आमदार आशिष शेलार यांनीही विधिमंडळात जोरदार आरोप करत राणेंची पाठराखण केली होती.

**फडणवीसांची घोषणा**

नीतेश राणे यांच्या आरोपानंतर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे प्रकरण अतिशय गंभीर असल्याचे म्हटले होते. तसेच फडणवीस यांनी या विषयावर एसआयटी चौकशी करण्याची घोषणा केली होती.

यावेळी ते म्हणाले होते की, बॉम्ब स्फोटातल्या आरोपीसोबत पार्टी करण्याचा विषय अतिशय गंभीर आहे. देशाचा शत्रू असलेल्या दाऊदचा जवळचा सहकारी सलीम कुत्ता हा खरे तर पॅरोलवर बाहेर होता. त्यामुळे त्याला पार्टी देखील करता येत नाही. त्यामुळे त्याने पार्टी करायची आणि कोणीतरी जाऊन त्या पार्टीत नाचायचे हा गंभीर प्रकार आहे.

१९९३ च्या बॉम्बस्फोटातील आरोपी सलीम कुत्ता सोबत या संबंधीत व्यक्तीचा काय संबंध आहे, अशी पार्टी करण्यात कोण-कोण होते, त्याला कोणाचा वरदहस्त होता का? हे तपासण्यात येईल. बॉम्बस्फोटातील आरोपीसोबत कोणी पार्टी करत असेल तर त्याचा अर्थ संवेदना मेल्यात असा होतो. म्हणून मी सभागृहाला आश्वस्त करू इच्छितो की एसआयटीच्या माध्यमातून ठरवून दिलेल्या वेळेत या प्रकरणाची तपासणी होईल. तसचे दोषींवर कारवाई केली जाईल, असे आश्वासन गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिले होते.

**नीतेश राणेंचा सूर बदलला**

दरम्यान आता नीतेश राणे यांचा सूर बदलला आहे. ते आज बोलताना म्हणाले की, हिंदुत्त्वाचा धागा घेऊन आमच्यासोबत कोणीही येत असेल तर आम्ही त्याचे स्वागतच करणार.

बडगुजर आता १०० टक्के भगवाधारी झाले आहेत. त्यामुळे ते आमच्यासोबत येणार असतील त्यांचे स्वागतच आहे. बडगुजर यांचा हिंदुत्वाच्या दिशेने जोरदार प्रवास सुरु आहे. त्यांचा मुलगा काही दिवसांपूर्वी आम्ही काढलेल्या सकल हिंदुत्व मोर्चात आघाडीवर होता. त्यामुळे आता ते येत असतील तर हरकत नाही.

**सुधाकर ते सुधारक...**

ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी नितेश राणे यांच्या या भूमिका बदलीवर टीका केली आहे. त्यांनी ट्विट करत म्हटले, सलीम कुत्ताच्या पार्टीतला बडगुजरसारख्या पापी जिवातम्यांचा हैदोस बघून भाचा नितेश राणेचे पित्त खवळले होते. यावर ५२ कुळी उपाय म्हणून तत्परता दाखवत सुधाकरला सुधारक ठरवण्याचा विडा हाती घेतला. बोले तो भिडू, यही बीजेपी का हिंदुराष्ट्र है, कल को सलीम कुत्ता भी आकर मॅटर क्लोज कर सकता है.

**निर्लज्ज लोकांचा भरणा**

संजय राऊत यांनी देखील टीका केली आहे. ट्विट करत ते म्हणाले, या सगळ्यांना मुंबई बॉम्ब स्फोटातील आरोपी करायला हवे! गृहमंत्री फडणवीस तुमचे लोक त्या सलीम कुत्ताला उगाच बदनाम करीत होते. भारतीय जनता पक्ष हा निर्लज्ज लोकांचा भरणा असलेला पक्ष आहे, देशभक्ती, हिंदुत्व वगैरे सगळे ढोंग आहे.

**बावनकुळेंचे कानावर हात..**

सुधाकर बडगुजर यांच्या भाजप पक्षप्रवेशावर प्रतिक्रिया देताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, सुधाकर बडगुजर यांच्या पक्षप्रवेशाबद्दल कुठलीही माहिती माझ्याकडे नाही. स्थानिक नेतृत्व, स्थानिक आमदार आणि खासदार यांचे एकमत झाल्याशिवाय आमच्याकडे प्रवेश होत नाही. तसेच त्यांच्या पक्षप्रवेशाबद्दल मला कुठलीही माहिती नाही, असे बावनकुळे यांनी स्पष्ट म्हटले आहे.

पुढे बोलताना बावनकुळे म्हणाले, नाशिकचे स्थानिक पदाधिकाऱ्यांचा या पक्षप्रवेशाला विरोध आहे निवडणुकीच्या राजकारणात जेव्हा आपण एकमेकांच्या विरोधात लढतो आणि आता निवडणुकीला फक्त सहा महिने झाले आहे. त्यामुळे विरोधाची भावना असते आणि त्यामुळे नाशिकमध्ये त्यांना विरोधाची भावना आहे.

त्याबद्दल माझ्याशी कुठलीही चर्चा झालेली नाही मुंबईत गेल्यानंतर चर्चा झाली तर हा विषय पुढे जाईल मात्र आतापर्यंत या संदर्भात माझ्याकडे कुठलीही माहिती नाही.

**सुधाकर बडगुजरांच्या भावना**

सुधाकर बडगुजर म्हणाले, २०१७ ते २०२२ हा पाच वर्षांचा कालावधी सोडला तर आता प्रशासकीय राजवट आहे. या राजवटीत जी कामे होत आहेत, ती प्रशासनामुळे सुरू आहेत. कामे होत असताना प्रशासनावरती लोकप्रतिनीधींचा अंकूश असला पाहिजे.

निवडणुका येऊ घातलेल्या आहेत. या निवडणुकीमध्ये भाजपला मोठे यश मिळावे यासाठी मी भाजपमध्ये प्रवेश करणार आहे. ज्या पक्षामध्ये आदरातिथ्य मिळते त्या पक्षामध्ये जाणे कधीही उचित आहे.

ज्या पक्षामध्ये मी १८ वर्षे काम केले त्यांनी माझा अनादर केला. मला पक्षातून हाकलण्याची भूमिका त्यांनी घेतली. माझी काय चूक होती तेही मला कळलेले नाही, असे म्हणत त्यांनी आपल्या मनातील भावना व्यक्त करत शिवसेनेवर नाराजी व्यक्त केली आहे.

ज्या पक्षामध्ये आदरातिथ्य मिळते त्या पक्षामध्ये जाणे कधीही उचित, असे जरी सुधाकर बडगुजर यांनी म्हटले असले तरी भाजपच्या अनेक नेत्यांकडून त्यांच्या पक्षप्रवेशाला विरोध आहे.

भाजपच्या स्थानिक आमदार सीमा हिरे यांनी देखील सुधाकर बडगुजर यांच्या पक्षप्रवेशाला विरोध केला आहे. त्यातच भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी देखील पक्षप्रवेशाची आपल्याला काही कल्पना नसल्याचे म्हटले आहे.

■ ■ ■

# युवकांनो स्वतःच्या भविष्याचा विचार करा...

आजकाल स्वतःच्या भविष्याचा विचार करण्यापेक्षा राजकीय नेत्यांच्या भविष्याचा विचार करणारे लोक प्रत्येक समाजात संख्येने खूप वाढले आहेत. विशेष करून युवा पिढीला राजकीय नेत्यांचे खूप आकर्षण वाटत आहे. त्यांना त्यांचे कट्टर कार्यकर्ते म्हणून मिरवायची फार विचित्र सवय लागली आहे.

आजकालचे युवक शिक्षण शिकायचे सोडून, नियमित कॉलेज करायचे सोडून आणि आपले जीवन ध्येय गाठायचे सोडून राजकीय नेत्यांच्या मागेपुढे फिरण्यात आघाडीवर आहेत. शाळा व कॉलेजला दांड्या मारून आणि प्रामाणिकपणे अभ्यास करायचा सोडून राजकीय नेत्यांचे बगलबच्चे म्हणून मिरवण्यात काय फायदा? स्वतःच्या भविष्याचा विचार करायचा सोडून, राजकीय नेत्यांच्या भविष्याचा विचार करणे खरंच योग्य आहे का? तुम्हीच सांगा मंडळी. मला तर हे योग्य वाटत नाही.

आई वडील मोठ्या आशेने आपल्याला शिक्षणासाठी शहरी भागात पाठवतात. शिक्षणासाठी आपल्याला खूप खूप पैसा पुरवतात. त्यांना सुद्धा वाटते की आपला मुलगा खूप खूप शिकून नोकरीला लागेल. एक दिवस आपले स्वप्न साकार करेल आणि आपल्याला सुखाचे दिवस दाखवेल. म्हणून ते मोठ्या आशेने जीवन जगत असतात. त्यांना काय माहित? आपला मुलगा शिक्षणाच्या नावाखाली राजकारणाचे धडे गिरवत आहे का राजकीय पक्षाचा कार्यकर्ता बनून सतरंज्या उचलत आहे.

मान्य आहे की, आपला नव्याने कॉलेजमध्ये प्रवेश झाला की, आपण थोडे दिवस नियमित कॉलेज करतो. मन लावून अभ्यास देखील करतो पण नंतर काही दिवसांनी तेथील राजकीय वातावरण पाहून आणि तशा मित्रांच्या संगतीत राहून आपण सुद्धा एखाद्या राजकीय नेत्याच्या पक्षात प्रवेश करतो आणि लगेच त्या पक्षाचा नेता आपला राजकीय गुरु बनतो. आपण त्याचे शिष्य बनतो.

नंतर गुरु-शिष्याचे नाते हे अतुट बनते. तो नेता आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक बनतो. आपल्याला कोणते तरी गल्लीतील साधे पद देऊन खुश करतो. आणि स्वाथार्साठी आपला पुरेपूर वापर करून घेतो. पण या युवकांना मात्र आपण तालुक्याचा नेता झाल्यासारखे वाटते. आणि लगेच त्याचे राहणीमान बदलते. नेत्यासारखे कपडे आणि नेत्यासारखी हेअर स्टाईल ठेवून हे युवक हे पद घेऊन गावभर मिरवतात.

बॅनरबाजी व पेपरबाजी करून स्वतः स्वतःच्या पदाचा प्रचार करतात. आपल्या नावापुढे त्या पदाचा उल्लेख मात्र आवर्जून करतात. त्यांना तो नेता प्राणप्रिय वाटायला लागतो. हे युवक त्या नेत्यासाठी जीव द्यायला पण मागे पुढे पाहत नाहीत. म्हणजे यांना स्वतःच्या भविष्यापेक्षा नेत्याच्या भविष्याची चिंता अधिक असते. त्यांना स्वतःच्या भविष्याचे काहीही देणे घेणे राहत नाही.

पण राजकीय नेत्यांच्या भविष्याचा विचार मात्र त्यांना रात्री सुखाची झोप सुद्धा येऊ देत नाही. एवढी राजकीय नेत्यांच्या भविष्याची चिंता त्यांना लागलेली असते. या लोकांना स्वतःच्या परिस्थितीची जाण नसते, स्वतःच्या भविष्याचा वेध नसतो, आपण काय करत आहोत याचे भान देखील नसते आणि आपले आई वडील काय करतात याचा थोडाही विचार नसतो तर त्यांच्या डोक्यात केवळ राजकारणाचे वेड असते.

आपला नेता कसा मोठा होईल? आणि जादा मताधिक्य घेऊन कसा निवडून येईल? याकडे मात्र त्यांचे विशेष लक्ष असते. ज्यावेळी लोकसभा व विधानसभा निवडणुका लागल्या जातात तेव्हा मात्र आमचे युवक आपल्या नेत्याला भरघोस मतांनी निवडून आणण्यासाठी खूप खूप प्रयत्न करतात. अहोरात्र त्यांचा प्रचार करण्यासाठी तालुका व जिल्हा पिंजून काढतात. त्यांना स्वतःच्या घराकडे देखील लक्ष द्यायला वेळ नसतो.

घरातील आई-वडील, बायको व मुले यांना विसरून ते प्रचार करण्यात एवढे मग्न होतात की, त्यांना स्वतःच्या पोटाला दोन घास खावे याचे देखील भान राहत नाही. घरचे पैसे घालून गाडीत पेट्रोल टाकायचे आणि त्या नेत्याचा प्रचार करायचा हे समीकरण सध्या सर्वत्र चालू आहे. काही काही महाभाग तर इलेक्शन मध्ये तालुक्याचे भांडण गावात आणतात, आपल्या नेत्याच्या विरोधात जर कोणी अपशब्द बोलला तर त्याच्यासोबत भांडण तंटे करायलाही मागे पुढे पाहत नाहीत.

पण एकमेकांच्या विरोधात प्रचार करणारी नेते मंडळी निवडून येऊ किंवा न येऊ पण ते आपले राजकीय ऋणानुबंध कधीच बिघडू देत नाहीत. पण हे युवक मात्र त्या राजकीय नेत्यांसाठी नाहक गावात दुश्मनी करून घेतात. यामध्ये या युवकांचा कवडीचाही फायदा नसतो. उलट त्यांना जमीन विकून घरून पैसा घालावा लागतो. त्यांचा फायदा आणि आपला तोटा हे वाक्य आमच्या युवकांना कधी कळणार? युवकांनो हे असे चालणार नाही. हे जरा लक्षात घ्या. त्यांच्यासाठी विनाकारण शिक्षणावर पाणी का सोडायचे? अशाने आपल्याला जीवन ध्येय कसे गाठता येईल?

अगोदर स्वतःच्या भविष्याचा विचार करा. स्वतःचे भविष्य घडवून स्वतःच्या पायावर उभे रहा. त्यासाठी खूप खूप शिक्षण शिका. अहोरात्र अभ्यास करा आणि आपल्या आई वडिलांचे स्वप्न साकार करून मग राजकारणात प्रवेश करा. कारण उपाशी पोटी बनलेला कार्यकर्ता लाचार बनतो हे आपल्याला डॉ.बाबासाहेबांनी अगोदरच सांगून ठेवले आहे.

उच्चशिक्षित व राजकीय वलय असलेला कार्यकर्ता राजकारणात यशस्वी होतो हे कोणालाही मान्य करावेच लागेल. नाहीतर अर्ध्यावर शिक्षण सोडून राजकीय नेत्यांच्या मागे फिरणारे युवक आज दिशाहीन होऊन अंधारातच चाचपडत आहेत.

त्यांना गावात कोणी विचारायला देखील तयार नाही. त्यांची घरे राजकारणात शेती विकून उध्वस्त झाली आहेत. खूप खूप शिक्षण शिकून व स्वतःच्या पायावर उभे राहून राजकारणात प्रवेश करणारे राजकारणी आज यशस्वी झाले आहेत. हे सत्य कोणालाही नाकारता येणार नाही.

म्हणून बांधवांनो खूप खूप शिक्षण शिका... नोकरीला लागून स्वतःच्या पायावर उभे रहा, स्वतःचे भविष्य घडवा आणि मग राजकारणात प्रवेश करा कारण तुमच्यावर लाचारी पत्करण्याची वेळ येणार नाही... हे नेहमी ध्यानात ठेवा...

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी. ता.अहमदपूर. जि.लातूर**
**7498715661**

■ ■ ■



# पाणीबाणी आणि वाड्यांची आनंदवार्ता...

राज्याच्या अनेक भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य हा स्वातंत्र्यांनंतरच्या इतक्या वर्षातही मोठा गहण प्रश्न आहे. उन्हाळ्याच्या दिवसात विदर्भातील मेळघाट तसेच मराठवाडा, खानदेश आणि राज्याच्या इतर काही भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवते. कित्येक अंतरावरून महिलांना डोक्यावर घगराभर पाणी आणावे लागते.

मात्र, अशाही बिकट परिस्थितीत काही आनंदवार्ता कानावर पडतातच.

ईगतपूरी तालुक्यातील टाकळ्याची वाडी आणि बोरीची वाडी या दोन गावांमध्ये अनेक वर्षांपासून पाण्याची भिषण समस्या होती. पण आता हे चित्र बदलणार आहे. एसएनएफ आणि दुर्गापरमेश्वरी प्रतिष्ठान, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने बोरीची वाडी आणि टाकळ्याची वाडी येथील पाणीयोजनेचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.

विशेष आनंदाची बातमी म्हणजे या प्रकल्पांतर्गत आम्ही निवडलेल्या जागी विहीरीचे काम पूर्ण झाले असून विहीरीला भरपूर पाणी लागले आहे. पाण्याने काठोकाठ भरलेली विहिर बघून आतापर्यंत घेतलेल्या परिश्रमाचे चिज झाल्याचे एसएनएफ सदस्यांना खुप समाधान आहे. या कामात गावकऱ्यांनी मनापासून श्रमदान केले. त्यांचा सहभाग खूपच प्रेरणादायी होता. त्यांच्या सहकार्यामुळेच हे स्वप्न प्रत्यक्षात येत आहे. आता पुढचे काम पाणी गावांपर्यंत पोहोचवणे... तीही आनंददाई बातमी येईलच लवकर...

सध्या तरी बोरीची वाडी आणि टाकळ्याच्या वाडीतील ग्रामस्थ लवकरच शुद्ध आणि मुबलक पाणी गावात पोहोचणार म्हणून आनंदी आहेत.

**प्रमोद गायकवाड, संस्थापक, एसएनएफ**
**योगेश क्षिरसागर, दुर्गापरमेश्वरी प्रतिष्ठान, ठाणे.**

■ ■ ■

# बेरोजगारांनी घरी बसायचं काय?

निवृत्ती नंतरही कर्मचाऱ्यांना करार पद्धतीने सेवेत घेता येईल असा निर्णय सरकारने नुकताच घेवून बेरोजगारी वाढविण्यास बळ दिल्याचे दिसून येते.

निवृत्तीनंतर सरकारी कर्मचारी किंवा अधिकारी यांना का म्हणून सेवेत ठेवायचे? निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सहा महिने अगोदर जर नवीन कर्मचारी नियुक्त केले तर त्या निवृत्त कर्मचाऱ्यांचे किंवा अधिकाऱ्यांचे संपूर्ण काम नवीन व्यक्ती सहा महिन्यांत सहज काम शिकुन करू शकतो. मग सरकार निवृत्त कर्मचाऱ्यांचे लाड का करीत आहे?

देशासह राज्यात मोठ्या प्रमाणात बेरोजगारीचे प्रमाणात वाढत असून मोठे सावट निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत सरकार जर अशा पध्दतीचे चुकीचे निर्णय घेत असेल तर राज्याची जनता कधीच माफ करणार नाही. कारण सरकारचे असेही म्हणणे आहे की निवृत्त कर्मचाऱ्यांला करार पद्धतीने वयाच्या ६५ वर्षांपर्यंत काम करता येईल. जर आवश्यकता भासली तर वयाच्या ७० वर्षांपर्यंत सुध्दा करता येईल.

यावरून आपण समजू शकतो की सरकार कडून बेरोजगारांवर कीतीमोठा घणाघाती प्रहार आहे हे आपल्या लक्षात आलेच असेल. त्यात महत्वाचे म्हणजे करार पध्दतीने नियुक्त झालेल्या निवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतनही सरकारने अवाढव्य ठेवले आहे . निवृत्तीच्या वेळी असलेले मुळ वेतन व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम ही करार पद्धतीने नियुक्त अधिकाऱ्यांना पारिश्रमिक म्हणून दिली जाईल. म्हणजेच त्या अधिकाऱ्यांचे वेतन जवळपास ८० ते ९० हजार राहील आणि याचे दुष्परिणाम राज्यातील बेरोजगार युवकांना भोगावे लागतील.

त्यामुळे सरकारने निवृत्त कर्मचाऱ्यांबद्दल किंवा अधिकाऱ्यांबद्दल जो करार पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे तो बेरोजगार युवकांना मोठ्या प्रमाणात नुकसान पोचविणारा असून अत्यंत घातक व चिंताजनक आहे.

यावर सरकारने पुनर्विचार करून करार पद्धतीने निवृत्त कर्मचाऱ्यांना घेण्याचा निर्णय ताबडतोब मागे घ्यावा असे मला वाटते.कारण राज्यात महागाई, बेरोजगारीसह अनेक जटील समस्या आहेत त्यात जत निवृत्त कर्मचाऱ्यांना सरकारनी करार पद्धतीवर जर सामावून घेतले तर आणखी गंभीर समस्या निर्माण होतील हेही तितकेच खरे.

निवृत्तीनंतरही करार पद्धतीने घेण्याच्या सरकारच्या निर्णयाला कर्मचारी/अधिकारी संघटनांकडून सुध्दा विरोध होत आहे आणि विरोध करने सहाजिकच आहे.सरकारच्या या निर्णयाला संघटनाच काय तर राज्याची १४ कोटी जनताही विरोध करेल.एककडे कर्मचारी संघटना निवृत्ती वय ५८ वरून ६० करण्याची मागणी करीत आहे.

सरकार म्हणत आहे की, ५८ वर्षांनंतर कर्मचाऱ्यांची काम करण्याची क्षमता तेवढी राहत नाही, असे कारण देत राज्य सरकार निवृत्तीचे वय ६० वर्षे करण्यास मंजुरी देत नाही,तर मग प्रश्न उपस्थित होतो की, वयाच्या ६५-७० वर्षापर्यंत त्यांची सेवा कशी काय घेता येईल, असाही मोठा प्रश्न आता निर्माण झाला आहे.

सरकार एकीकडे सांगते की ५८ वर्षांनंतर त्या व्यक्तीची काम करण्याची क्षमता कमी असते आणि दुसरीकडे निवृत्तीनंतर ६५-७० वर्षांपर्यंत करार पद्धतीने कामावर ठेवण्यास मंजुरी देते हि तर सरकारची मनमानीच म्हणावी लागेल यावर सरकारने व पक्ष-विपक्षांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

सरकारने घेतलेला निर्णय चुकीचा असल्याने तो ताबडतोब मागे घ्यावा. असे चुकीचे निर्णय घेण्यापेक्षा राज्य सरकारने नियमित कर्मचारी व अधिकारी यांची भरती करावी. यामुळे बेरोजगारीवर आळा बसेल व बेरोजगारांना सरकारी सेवेत नौकरी करण्याची संधी मिळेल आणि याचे स्वागत सर्वच स्तरातून केले जाईल.त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेला कोणत्याही प्रकारची ठेच पोहचणार नाही याची सरकारने काळजी घ्यावी.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

■ ■

## अशोकायन



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

### पराधिन जगती..!

**कुणाचा मृत्यु कसा होईल**
**हे येत नाही सांगता**
**विज्ञानाने केली कितीही प्रगती**
**पण खरा सुत्रधार**
**तोसृष्टीचा नियंता..!**

**पाप पुण्याचाआपण -**
**करत बसतो**
**गुणाकार भागाकार**
**पण नियतीच्या मनातलं**
**कुणीच**
**ओळखु शकत नाही**
**भविष्यकार..**

**जसे कर्म तसे फळ**
**हे आहे एक गृहीत**
**पण विवेक बुध्दीने**
**वागणे हे असते उचित..!**

**खोटे नाटे उद्योग करुनी**
**कमवु पहातो मानव संपत्ती**
**पण होत्याचे नव्हते होण्यास**
**सांगा वेळ लागतो किती?**

**ईर्षा द्वेश लोभ टाळुनी**
**संयमाने जग जिंकावे**
**आत्मिक समाधाना सम**
**सुख नाही हे ध्यानी धरावे ..**

**आले देवाजीच्या मना**
**तेथे कुणाचे चालेना**
**भयानक विमान दुर्घटनेतुन**
**त्याने एकालाच वाचविले ना..!**

**२७४ जणांचे हिरावुनी प्राण**
**नियतीचे तांडव नृत्य थांबले**
**पिडीत कुटुंबांच्या वेदना व्यक्त**
**कराया शब्दही नच उरले ..**

**ज्याचे जिथे मरण तेथे**
**निश्चीत पाय ओढून नेती**
**खरेच मानव नाही का**
**पराधिन या जगती?..**

## इस्त्रोचं धाडसी पाऊल, अभिमानास्पद आणि प्रेरणादायी

**वाचक लिहितात**

इस्त्रोने पुन्हा एकदा सिद्ध केलं की, सुरक्षा हेच सर्वोच्च प्राधान्य आहे. अमेरिकेतील Axiom-4 मोहिमे अंतर्गत फाल्कन-9 रॉकेटचे प्रक्षेपण ११ जून रोजी नियोजित होते. हे रॉकेट भारत, अमेरिका, पोलंड आणि हंगेरीच्या ४ अंतराळवीरांना अंतराळ स्थानकावर घेऊन जाणार होते. पण, इस्त्रोने सखोल चाचण्या आणि लो टेंपरेचर लिक टेस्टची मागणी केली.

पोलंड आणि हंगेरीनेही इस्त्रोच्या भूमिकेचे समर्थन केले. स्पेसएक्सकडून यावर तात्पुरत्या उपायांची तयारी होती. परंतु, इस्त्रोने ती साफ नाकारली. संभाव्य धोका ओळखून इस्त्रोने वेळेवर योग्य निर्णय घेतला. डॉ. व्ही. नारायणन यांच्या अनुभवामुळे मोठा अपघात टाळता आला. १३ सदस्यीय भारतीय तज्ञ पथकाने फ्लोरिडातील केनेडी स्पेस सेंटरवर थेट हस्तक्षेप केला. सेफ्टी फर्स्ट, लॉंच लेटर ही भूमिका खऱ्या विज्ञाननिष्ठेचे उदाहरण ठरली. यामुळे अखेर मागणी नुसार चाचणी करावी लागली. आणि इस्त्रोच्या अंदाजानुसार ती सदोष आढळली. काही महत्वाचे दोष रॉकेटमधे होते. त्यामुळे अपघाताची पूर्ण शक्यता होती. या मोहिमेत भारताचे वैमानिक ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला हे आहेत.

त्यांच्या सुरक्षिततेसाठी इस्त्रोने आवश्यक तो धोरणात्मक निर्णय घेण्यास मागेपुढे पाहिले नाही. इस्त्रोची ही भूमिका म्हणजे भारतीय अंतराळ संशोधन संस्थेची वैज्ञानिक प्रगल्भता दर्शवते. प्रत्येक भारतीयाला या निर्णयाचा अभिमान आहे. भारत आता केवळ प्रक्षेपण करणारा देश नाही, तर जागतिक धोरण ठरवणारा बनला आहे. ही घटना इस्त्रोच्या आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेची साक्ष देणारी आहे. हे खरे वैज्ञानिक नेतृत्व आहे, जे धाडस आणि विवेक दोन्ही जपतं. ही भूमिका केवळ अभिमानास्पद आहे असे नव्हे तर नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. संपूर्ण देश इस्त्रोच्या या निर्णयामुळे गर्वाने उभा आहे. इस्त्रोचे मनःपूर्वक अभिनंदन!

■ **सौ. प्रांजली विजय ब्रम्हे**
**नागपूर.**

# रेडी टू ईट फूड खाणे चांगले की धोकादायक?



आजच्या धावपळीच्या जीवनात, रेडी-टू-ईट अन्नाचा ट्रेंड झपाट्याने वाढत आहे. ऑफिसला जाण्याची घाई असो, मुलांच्या टिफिनचा ताण असो किंवा रात्री उशिरापर्यंतची भूक असो, अशा प्रत्येक प्रसंगी रेडी-टू-ईट अन्न हा एक सोपा उपाय असल्याचे दिसून येते.

हे पदार्थ चवीला छान लागतात आणि वेळही वाचवतात. पण ही सोय तुमच्या आरोग्यावर परिणाम करत नाही का? हे पदार्थ दीर्घकाळ वापरल्यास शरीराला हानी पोहोचवू शकतात का?

तयार अन्न जास्त काळ खराब होऊ नये म्हणून त्यात अनेक प्रकारचे प्रिझर्वेटिव्ह्ज मिसळले जातात. ही रसायने अन्न खराब होण्यापासून रोखतात, परंतु हेच रसायने पोट आणि यकृतासाठी समस्या निर्माण करू शकतात. सोडियम, नायट्रेट, ट्रान्स फॅट आणि कृत्रिम चव देणारे घटक अनेकदा त्यात मिसळले जातात, ज्यामुळे शरीरात हळूहळू विषारी घटक वाढतात. याच्या जास्त सेवनाने रक्तदाब, लठ्ठपणा, मधुमेह आणि अगदी हृदयाचे आजार देखील होऊ शकतात.

रेडी टू ईट फूडचा सर्वात मोठा तोटा म्हणजे ताज्या अन्नाच्या तुलनेत ते पोषणात खूपच कमी असते. त्यात आवश्यक जीवनसत्त्वे, फायबर आणि प्रथिने कमी प्रमाणात असतात, तर कॅलरीज, मीठ आणि फॅट खूप जास्त प्रमाणात असते.

हेच कारण आहे की या अन्नामुळे पोट लगेच भरते पण शरीराला आवश्यक पोषण मिळत नाही. अशा अन्नाचे सतत सेवन केल्याने रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होऊ शकते आणि थकवा, आळस आणि एकाग्रतेचा अभाव यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

रेडी टू ईट फूड सोयीसाठी अधूनमधून खाल्ले जाऊ शकते, परंतु ते नियमितपणे खाणे धोकादायक ठरू शकते. विशेषतः लहान मुले आणि वृद्धांनी त्यापासून दूर राहावे. जास्त पॅक केलेले आणि प्रक्रिया केलेले अन्न खाल्ल्याने आम्लता, गॅस, अपचन आणि बद्धकोष्ठता यासारख्या पोटाच्या समस्या देखील उद्भवू शकतात.

याशिवाय, तयार अन्नामध्ये अनेकदा सोडियमचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे मूत्रपिंडांवर परिणाम होऊ शकतो. जास्त मीठ शरीरात पाण्याची कमतरता आणि सूज यासारख्या समस्या देखील वाढवू शकते.

जे लोक असे अन्न जास्त काळ खातात त्यांना हाडांची कमकुवतपणा, त्वचेच्या समस्या आणि मानसिक ताण यासारख्या समस्यांना देखील तोंड द्यावे लागू शकते. म्हणून, रेडी टू ईट फूड टाळा.

■ ■ ■

# पाटबंधारे विभागाकडून उपकेंद्र उभारणीसाठी अवाढव्य भाडे
## ग्राहकांची वीज पुरवठा उभारणी अडथळा

**मनोर, दि. १७ : प्रतिनिधी**

सावरखंड उपकेंद्रा अंतर्गत ढेकाळे फिडर वरील दहा ते बारा हजार व्यवसायिक तसेच घरगुती वीज ग्राहक गेल्या काही वर्षांपासून विजेच्या समस्यामुळे हैराण झाले आहेत.पाटबंधारे विभागाकडून उपकेंद्र उभारणीसाठी जागा उपलब्ध झाल्याने आनंदात असलेल्या वीज ग्राहकांना पाटबंधारे विभागाने सोळा लाख वार्षिक भाडे आकारून मोठा झटका दिला आहे.भाड्याची रक्कम आवाजवी असल्यामुळे उपकेंद्र निर्मितीचे भविष्य अंधारात गेले आहे.

महावितरण कंपनी कडून ढेकाळे गावाच्या हद्दीतील पाटबंधारे विभागाच्या जागेत उपकेंद्रासाठी भाडे तत्वावर एक एकर जागेची मागणी पाटबंधारे विभागाकडे केली होती.महावितरण कंपनीच्या मागणी नुसार कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या २४ व २६ सप्टेंबर २०२४ रोजी पार पडलेल्या एक एकर जागा महावितरण कंपनीला उपकेंद्र उभारणीसाठी भाडे तत्वावर देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला होता.



बावीस गावे आणि शंभर पेक्षा अधिक पाडयांना विजपुरवठा करण्यासाठी नियोजीत ढेकाळे उपकेंद्रासाठी आवश्यक जमीन १६ लाख ५६ हजार ७८४ रुपयां ऐवजी प्रतीवर्ष एक रुपया नाममात्र दराने देण्याची विनंती महावितरण कंपनी कडून पाटबंधारे विभागाकडे करण्यात आली आहे.

सर्वसामान्य ग्राहकांवर वाढीव विजबिलाचा भार पडू नये यासाठी उर्जा विभागा अंतर्गत असलेल्या महावितरण कंपनीला विद्युत उपकेंद्र उभाणीसाठी शासकीय विभागाच्या जमीनी प्रती वर्ष एक रुपया दराने भाडेपटटयाणे देण्याचे शासनाचे धोरण असल्याच्या शासन निर्णयाचा दाखला देत भाडयाच्या रकमेबाबत पुर्नविचार करून सुधारीत भाडे आकारण्याची विनंती महावितरण कंपनीने पाटबंधारे विभागाला पत्राद्वारे केली आहे.

पाटबंधारे विभागाकडून एक एकर जागेसाठी तब्बल १६ लाख ५६ हजार ७८४ रुपये भाडे आकारणी केल्यामुळे ढेकाळे येथे उपकेंद्राच्या उभारणी बाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.एक रुपये इतक्या नाममात्र दराने जागा भाड्याने मिळण्याच्या आशेत असलेल्या महावितरण कंपनीला पाटबंधारे विभागाकडून धक्का देण्यात आला आहे.

पाटबंधारे विभागाकडून एक एकर जागेच्या भाड्या पोटी 14 लाख चार हजार 54 रुपये तसेच 18 टक्के जीएसटीची रक्कम मिळून वार्षीक भाड्याची रक्कम १६ लाख ५६ हजार ७८४ इतकी आकारण्यात आली होती.

पाटबंधारे विभागाकडून आकारण्यात आलेल्या भाड्याच्या रकमेमुळे महावितरण कंपनी हतबल झाली असून शासन निर्णयाचा दाखला देत नियोजित ढेकाळे उपकेंद्राच्या उभारणीसाठी एक रुपया नाममात्र दराने जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

# औद्योगिक वसाहतींना नळ कनेक्शन देऊ नका
## माजी नगरसेवक सुनील आचोळकर यांची मागणी

**वसई, दि. १७ : प्रतिनिधी**

वसई पूर्वेकडील ग्रामीण भागातील 50 टक्के जनता अजूनही महापालिकेच्या पाण्यापासून वंचित आहेत. त्यामुळे त्यांना सतत पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. दुसरीकडे, यापरिसरात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक वसाहती आणि लहान मोठे कारखाने आहेत. त्यांच्याकडून नळकनेक्शनची मोठ्या प्रमाणावर मागणी केली जात आहे. ही मागणी लक्षात घेता प्रथम पाण्यापासून वंचित असलेल्या 50 टक्के जनतेला पाणी द्या. त्याआधी औद्योगिक वसाहतींना पाणी कनेक्शन देऊ नका, अशी आग्रही मागणी बहुजन विकास आघाडीचे माजी नगरसेवक सुनील आचोळकर यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

वसई पूर्वेकडील, गोखीवरे, सातीवली, वालीव यामोठ्या गावांसह अनेक लहानसहान गावांमध्ये अद्यापही महापालिकेकडून पूर्णपणे पाणीपुरवठा करण्यात आलेला नाही. किमान 50 टक्के नागरीक महापालिकेच्या पाण्याच्या प्रतिक्षेत आहेत. सध्या एमएमआरडीए पाणीपुरवठा योजनेतून महापालिकेला पाणी पुरवठा सुरु झाला असून त्यातील पाणी पूर्वेकडील ग्रामीण भागात वितरित करण्यात यावे. नळकनेक्शन देताना जनतेला प्राधान्य देऊन त्यांची पाणी टंचाईतून मुक्तता करण्यात यावी, अशी आचोळकर यांची मागणी आहे.

यापरिसरात मोठ्या प्रमाणाव चाळी असून त्यात गोरगरीब जनता राहते. त्यांना बोअरिंग किंवा विहीवर अवलंबून रहावे लागते.



फेब्रुवारीनंतर यापरिसरात पाणी टंचाई जाणवत असते. म्हणूनच यापरिसरात पाणी वितरण व्यवस्था करण्यात यावी, अशी आचोळकर यांची मागणी आहे.

तसेच आपल्या वसई विरार शहर महानगरपालिकेकडून आजपर्यत सदर मोठया प्रमाणाच्या लोकसंखेच्या भागामध्ये पाण्याचे वितरण पुर्णपणे झाले नसून जवळ जवळ पन्नास टक्के नागरीक महानगरपालिकेच्या पाण्यापासून वंचित आहेत. असे असताना औदयोगीक वसाहतीमधील कारखानदार, लहानमोठे कारखानदार पाणी कनेक्शन मिळावे यासाठी महापालिकेकडे अर्ज करत असल्याचे आचोळकर यांनी महापालिका आयुक्तांच्या निर्दशनास आणून दिले आहे. सध्याची परिस्थिती पाहता पाणी कनेक्शन औदयोगिक कारखान्यांना देऊ नये. कारण शहरवासियांनाच पाण्याचे वितरण पुर्णपणे झाले नसून कारखानदारांना पाणी देणे, हा मानवतेच्या दृष्टीने मोठा अन्याय होईल, असे आचोळकर यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, शहरवासियांची पाणी टंचाईतून मुक्तता करण्याऐवजी औद्योगिक वसाहती आणि व्यावसायिकांना महापालिकेने पाणी पुरवठा केल्यास जनआंदोलन केले जाईल, असा इशाराही आचोळकर यांनी दिला आहे.

## उल्हासनगर महानगरपालिकेची प्रारूप प्रभाग रचनेबाबत बैठक संपन्न

**उल्हासनगर, दि. १७ : प्रतिनिधी**

आगामी महानगरपालिकेच्या निवडणुका २०२५ मध्ये होणार असल्याने नगर विकास विभाग महाराष्ट्र शासनाच्या आदेशाने "ड" वर्ग महानगरपालिकेच्या प्रारूप प्रभाग रचना करन्याचे काम सुरु झाले आहे. माननीय न्यायालयाच्या निर्देशा नुसार प्रारूप प्रभाग रचना तयार करते वेळी गोपनीयता ठेवुन या सर्व नियमांचे पालन करन्याच्या सुचना निवडणुक आयोगाने दिल्या आहेत.

तेव्हा १६ जून रोजी ४ .३० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रारूप प्रभाग रचनेचा आलेख तयार करन्यासाठी महापालिकेच्या स्थायी समिति सभागृहात अतिरिक्त आयुक्त डॉ. किशोर गवस यांच्या मार्गदर्शना खाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. उल्हासनगर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्राचा आलेख तयार करन्यासाठी समिति स्थापन केली आहे. या बैठकी मध्ये अतिरिक्त आयुक्त श्री. किशोर गवस यांनी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना जनगणनेची माहीती आणि इतर घटकाना लक्षात घेता सोबत गूगल मॅपचा उपयोग करुन प्रभाग रचना करन्या करीता अधिकारी व कर्मचारी यांचे पथक तयार करुन प्रत्यक्ष जागेवर जावुन निरीक्षण करुन प्रभाग रचनेची सीमा तयार करन्यासाठी निवडणुक कामासाठी कर्मचारी वर्ग यांची नियुक्ती करणे , प्रभागाचे नकाशे तयार करने, प्रभाग रचनेचे प्रारूप तयार केल्या नंतर हरकती व सुचना आल्या नंतर त्यावर सुनावणी होणार आहे .हे सर्व झाल्यावर अंतिम प्रभाग रचनेचे प्रारूप निवडणुक आयोगाला सादर करण्यात येणार आहे. अशा सुचना सदर बैठकीत संबंधित अधिकारी व कर्मचारी देण्यात आल्या आहेत.

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**भाईंदर, दि. १७ : प्रतिनिधी**

एका तेरी वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिला गर्भवती केल्याचा धक्कादायक प्रकार मीरारोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत उजेडात आला आहे. याप्रकरणी आरोपी भोला चव्हाणविरोधात बलात्कारासह पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मीरारोड येथे राहणाऱ्या पिडीत मुलीच्या पोटात दुखत असल्याने तिला आईने डॉक्टरांकडे उपचारासाठी नेले असता ती गर्भवती असल्याचे निदान झाले. त्यानंतर आईने अधिकची चौकशी केली असता शेजारी राहत असलेला भोला चव्हाण गेल्या सहा महिन्यांपासून धमकी देऊन जबरदस्तीने शारिरिक संबंध ठेवत असल्याचे पिडीतेने सांगितले. त्यानंतर आईच्या तक्रारीवरून भोला चव्हाणविरोधात मीरारोड पोलिसांनी बलात्कारासह पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

## बिल्डरकडून 2 कोटी 17 लाखांची फसवणूक

**भाईंदर, दि. १७ : प्रतिनिधी**

एकावेळी जास्त सदनिका खरेदी केल्यास कमी दरात देण्याचे आमिष दाखवून बांधकाम कंपनीच्या भागिदारांनी २ कोटी १७ लाख रुपयांची फसवणुक केल्याप्रकरणी काशिमीरा पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. अश्विन प्रेमजी भानुशाली यांनी आपला भाऊ आणि मित्रांसोबत सदनिका खरेदी गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यावेळी ओम कन्सट्रक्शन कंपनीच्या भागिदारांनी जादा सदनिका खरेदी केल्यास कमी दरात देऊ, असे आमिष दाखवले होते. त्यानुसार भानुशाली यांनी भाऊ आणि मित्रासोबत १७ सदनिका खरेदी करण्यासाठी २ कोटी १७ लाख रुपये दिले होते. त्यावेळी बिल्डरने त्यांना अलॉटमेंट लेटरही दिले होते. काही दिवसांनी बिल्डरने ओम टॉवरऐवजी मिरागावात सुरु असलेल्या अविघ्ना कॉम्पलेक्समधील सदनिका देऊ, असे सांगतिले होते. मात्र, बिल्डरने सांगितल्याप्रमाणे व्यवहार पूर्ण केला नाही. उलट नवा भागिदार घेऊ अविघ्ना कॉम्पलेक्समधील सदनिका परस्पर विकून गंडा घातला. याप्रकरणी भानुशाली यांच्या तक्रारीवरून काशिमीरा पोलिसांनी विनोद पटेल, अशोक करकेरा (मयत), विद्या अशोक करकेरा, प्रशांत वघसिया उर्फ पटेल, निर्मला वघसिया उर्फ पटेल यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

## झोमॅटो डिलीव्हरी बॉयकडून लाखोंचे एमडी जप्त

**भाईंदर, दि. १७ : प्रतिनिधी**

झोमॅटोची डिलिव्हरी करणाऱ्या एका इसमाकडून दहा लाख ६८ हजार रुपये किंमतीचे एमडी हे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहे. काणी तन्वीर खान (३२, चंद्रेश अकार्ड, सिल्वर पार्क, मीरारोड) असे आरोपीचे नाव आहे. अमली पदार्थ विरोधी कक्षाच्या मीरा भाईंधरच्या पथकाने मीरारोड येथील सृष्टी परिसरातून काणी खानला ताब्यात घेऊन त्याची झाडाझडती घेतली असता त्याच्याकडून १० लाख ६८ हजार रुपयांचा एमडीचा साठा पोलिसांच्या हाती लागला. याप्रकरणी मीरारोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कामण हत्याकांडातील दोन्ही आरोपी जेरबंद

**वसई, दि. १७ : प्रतिनिधी**

व्याजाच्या पैशांवरून झालेल्या वादातून एका इसमाची हत्या करणाऱ्या दोन्ही आरोपींना नायगाव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने अटक केली आहे. मोहम्मद हसीम आणि रईस उर्फ लोधे शेख अशी आरोपींची नावे आहेत. वसई पूर्वेकडील कामण गावात असलेल्या हॉटेल वारसी हॉटेलचा मालक मोहम्मद हसीम याने संजय निठोहर प्रजापती (३५) यांच्याकडून व्याजाने पैसे घेतले होते. पैसे घेतल्यानंतर मोहम्मद हसीम व्याजही देत नव्हता आणि पैसे ही परत करत नव्हता. त्यावरून मोहम्मद हसीम आणि संजय प्रजापती यांच्या वाद होत होता. ८ जूनला दुपारी साडेतीन वाजता संजय प्रजापती पैसे मागण्यासाठी मोहम्मद हसीमला भेटण्यासाठी हॉटेलमध्ये गेला असता त्यांच्यात पुन्हा वाद झाला. तेव्हा संतापलेल्या मोहम्मद हसीम आणि त्याचा साथिदार रईस शेख यांनी संजय प्रजापतीला बेदम मारहाण केली. इतकेच नाही तर गॅस सिलेंडरचा टाकीने मारहाण केली. त्यात संजय प्रजापतीचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी नायगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला असता मोहम्मद हसीम आजारी असल्याचे सांगून उपचारासाठी रुग्णालयात दाखल झाला होता. तर रईस शेख घटनास्थळावरून पसार झाला होता. नायगाव पोलिसांची दोन पथके रईसला शोधण्याचे काम करत होते. रईस घटनास्थळी चप्पल टाकून पसार झाल्याचीही माहिती मिळाल्यावरून पोलिस अनवाणी फिरणाऱ्या इसमाचाही माग घेत होते. वसई रोड रेल्व परिसरात एक संशयास्पद अनवाणी फिरणाऱ्या इसमाला ताब्यात घेतले असता रईसने हत्या केल्याची कबुली केली. त्यानंतर मोहम्मद हसीमलाही अटक करण्यात आली.

## बिल्डरला कोट्यवधी रुपयांचा गंडा

**वसई, दि. १७ : प्रतिनिधी**

नालासोपारा पूर्वेकडील मोरेगावात बांधलेल्या इमारतीमधील २१ रुम आणि एक गाळा परस्पर विकून १ कोटी ७६ लाख रुपयांना गंडा घातल्याप्रकरणी तुळींज पोलिसांनी सुचेतन सुनील कुलकर्णीविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कल्याणजी चोटालिया यांच्या मालकीच्या मोरेगावातील गायत्री आणि चामुंडा इमारतीत २१ रुम आणि एक गाळा आहे. सुचेतन कुलकर्णी यांनी चोटालिया यांना अंधारात ठेऊन रुम आणि गाळ्याची परस्पर विक्री करून गंडा घातल्याची चोटालिया यांची तक्रार आहे.

# भिवंडीत आज पाणी पुरवठा बंद

**भिवंडी, दि. १७ : प्रतिनिधी**

शहरात पाणीपुरवठा करणाऱ्या स्टेम वॉटर डिस्ट्रीब्यूटर कंपनीच्या वतीने दैनंदिन देखभाल दुरुस्ती करता बुधवारी १८ जून रोजी सकाळी नऊ वाजेपासून ते गुरुवारी १९ जून रोजी सकाळी नऊ पर्यंत २४ तास पाणी पुरवठा बंद करण्यात येणार असून पुढील एक दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होणार असल्याने नागरिकांनी पाणी जपून वापरावे असे आवाहन भिवंडी मनपा पाणीपुरवठा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.या भागांना बसणार पाणी बंदचा फटका- ममता टाकी, चाविंद्रा गांव, पटेलनगर, बाला कंपाऊन्ड, फरीदवाग, वारक्या कंपाऊन्ड, संगमपाडा. कचेरोपाडा, कसारआळी, कोंबडपाडा, आदर्शपार्क, अजयनगर, नझराना कंम्पाऊंड, गोकुळनगर, इंदिरानगर, कल्याणरोड, ठाणगेआळी, तीनवत्ती, शिवाजीनगर स्टाफ क्वॉटर्स, गुरुचरणपाडा, अजमेरनगर, पटेल कंपा. शमानगर, साईनाथ सोसायटी, अंजूरफाटा, देवजीनगर नारपोली, विठ्ठलनगर, सोनोवाई कंपाउंड,खलीक कंपाउन्ड, भंडारी कंपाउन्ड, नारपोली गांव, देवजीनगर, आय.जी. एम. पाण्याची टाकी, निजामपूरा, इस्लामपुरा, आमपाडा, अर्वाचतपाडा, म्हाडा कॉलनी, शास्त्रीनगर, नेहरूनगर, मिल्लत १.२.३. नविवस्ती, कोंडाजीवाडी, चव्हाणकॉलनी, वेताळपाडा, वाळा कंपाउन्ड, खंड़पाडा. अंसार मोहल्ला, डोलारे पेट्रोलपंप, खोका कंपाउन्ड, कामतघर, अंजूरफाटा. जूनी ताडाली, नवी ताडाली. भाग्यनगर, हनुमान नगर, कमला हॉटेल परीसर, गणेश सिनेमा, नवजीवन कॉलनी, पद्मानगर, अशोकनगर, घुंघटनगर, कोटरगेट, वरफ गल्ली, कापआळी, उर्दू रोड. कुरेशनगर, लाहोटी कंपाउन्ड, भादवड, टेमघर, वराळादेवी नगर, चंदनवाग, ओसवालवाडी, रेल्वे स्टेशन रोड, साठे नगर, नवीन ताडाळी, नदीनाका, हाजी कम्पाऊंड, पटेल नगर, खडकराड, नागांव, असलम नगर, मुश्ताक कम्पाऊंड, पदमानगर वरचा भाग, चौधरी कंपाउन्ड, कामतघर. पदमानगर वाळु पाटील चोक, पदमानगर गायत्रीनगर, आसबीवी परीसर. खडी मशीन रोड, कल्याण रोड, शास्त्रीनगर पोस्ट ऑफिस परीसर, गेबीनगर आंनद टाकीज मागच्या भागात. भारत कंपाऊन्ड, मुरळीधर कंपा. नारायण कंपा. सुभाषनगर गेवीनगर, गणेश सोसायटी गैबीनगर, अशोकनगर, गोपाळनगर, तीनबत्ती, जेतुनपुरा या भागात पाणी पुरवठा बंद राहणार आहे.

# खेकड्यांसाठी खवय्यांची भटकंती

**वाडा, दि. १७ : प्रतिनिधी**

पावसाच्या दमदार आगमनानंतरही खेकड्यांचे (मुठे) विक्रीसाठी आगमन अजून पुरेसे प्रमाणात न झाल्याने या खेकड्यांची चव घेण्यासाठी अतुर असलेल्या खवय्यांवर खेकड्यांच्या शोधात बाजारपेठांत, गांव-पाड्यात तसेच रात्रीच्यावेळी पळींदा व बॅटरी घेऊन रानमाळावर वणवण भटकंती करण्याची वेळ आली आहे.



पावसाच्या आगमनानंतर जमिनीत ओलावा निर्माण झाला की, जमिनीतून खोलवर बिळांमध्ये असलेले मुठे बाहेर पडतात. अत्यंत चपळ असलेल्या या मुठ्यांना पकडून ते शिजवून जेवणातील एक चांगला गुणकारी व चवदार खाद्य पदार्थ भाजी म्हणून बनवून खाल्ला जातो. जून महिन्याच्या दुस-या आठवड्यात पाऊस अधूनमधून सुरु झाला असून जंगल भागात व माळरानावर गवताचे प्रमाण अधिक झाले आहे.

खेकड्यांचे अन्न असलेले गवत अगदी खेकड्यांना बिळाजवळच उपलब्ध झाल्याने हे चपळ असलेले खेकडे (मुठे) पकडणे कठीण झाले आहे. यामुळे बाजारात मुठ्यांची विक्री करणाऱ्या बांधवांची संख्या आता कमी दिसत आहे. यामुळे खेकड्यांची चव चाखण्यासाठी अतुर असलेल्या खवय्यांना खेकड्यांसाठी गाव-पाड्यावर भटकंती करावी लागत आहे.

खेकड्यांचे आहारातून (मुठे) सेवन केल्याने कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी होण्यास मोठी मदत मिळते. तसेच प्रतिकारशक्ती वाढवते. निरोगी आरोग्यासाठी खेकडा हे उत्तम सीफूड आहे. सर्दी किंवा पडसे झाले असेल तर शरीरातील उष्णता वाढवण्यासाठी खेकड्याचे सेवन केले जाते. खेकड्यामध्ये असलेले व्हिटॅमिन्स हे त्वचेची चमक आणि केसांसाठी उपयुक्त ठरतात.तसेच खेकड्यात कॅल्शियमचे प्रमाण जास्त असल्याने हाडांच्या मजबूतीसाठी खेकड्याचे सेवन फारच गुणकारी मानले जात आहे.

## उल्हासनगरमधील गणेश नगर येथे पावसाने कोसळला पूल

**उल्हासनगर, दि. १७ : प्रतिनिधी**

उल्हासनगर कॅंप ५ येथील गणेश नगर ला जोडणारा पुल पावसाने कोसळला असुन ५०० नागरिकांचा येण्या जाण्याचा रस्ता बंद झाला आहे. महापालिकेच्या या ढिसाळ कामावर स्थानिकानी टिका केली आहे .

उल्हासनगर कॅंप ५ येथील गणेश नगर कडे जाणारा एकमेव पुल आहे . तो पुल अत्यंत जुना असुन महापालिकेने त्या पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट केले नाही किंवा दुरुस्ती केली नाही . त्यामुळे तो पुल जिर्ण झाला होता . काल कोसळलेल्या धुव्वादार पावसाने पुल कोसळला आहे . गणेश नगर कडे जाणारा हा एकमेव रस्ता या पुलावरुन असल्याने येथील ५०० नागरिकांचा पुल कोसळल्यामुळे रस्ता बंद झाला आहे. दरम्यान उल्हासनगर महापालिकेने या पुलाची वेळीच दुरुस्ती केली असती तर आज हा पुल सुरक्षित राहिला असता, अशा प्रतिक्रिया स्थानिक नागरिकानी दिल्या आहेत.

## महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे गटाचा स्वबळाचा नारा

**वसई, दि. १७ : प्रतिनिधी**

आगामी वसई विरार महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने स्वबळावर जास्तीत जास्त जागा लढवण्याचा आणि जिंकून आणण्याचा निर्धार शिवसेना नेते, वरिष्ठ पदाधिकारी आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत घेण्यात आला. आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वरिष्ठ पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेण्यासाठी शिवसेना नेते, सचिव आणि माजी खासदार विनायक राऊत, शिवसेना उपनेते युवासेना सचिव अमोल कीर्तीकर आणि माजी आमदार स्थानीय लोकाधिकार समितीचे कार्याध्यक्ष विलास पोतनीस नालासोपारा येथे आले होते. त्यावेळी वरिष्ठ नेत्यांनी पदाधिकारी आणि शिवसैनिकांची मते जाणून घेतली. त्यावेळी सर्वांनी स्वबळावरच निवडणुक लढवण्याचा मुद्दा उचलून धरला. त्यामुळे वसई विरार महापालिकेत महाविकास आघाडीतून ठाकरे गट बाहेर पडल्याचे सध्याचे चित्र आहे. ह्या बैठकीस जिल्हाप्रमुख प्रविण म्हाप्रळकर, लोकसभा संघटक पंकज देशमुख आणि जनार्दन पाटील, महिला जिल्हा संघटक किरण चेंदवणकर आणि नम्रता वैती, जिल्हा उपप्रमुख दिलीप चेंदवणकर, किशोर पाटील आणि भारती गावडे, तालुकाप्रमुख प्रथमेश राऊत, युवा सेनेचे रोहन चव्हाण, जयेश पाटील, प्रतीक जाधव , अंगीकृत संघटनांचे अजहर खान, नितीन रावकर, आनंद चोरगे, जिल्हा, तालुका आणि शहर स्तरावरील पदाधिकारी उपस्थित होते.

## परदेशात नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या महिला गजाआड

**भाईंदर, दि. १७ : प्रतिनिधी**

युरोपीय देशात नोकरी लावण्याचे आमिष दाखवून गोवा राज्यातील पती-पत्नीकडून चार लाख ८० हजार रुपये घेऊन परागंदा झालेल्या दोन महिलांना गुन्हे शाखा एकच्या काशिमारी पथकाने गोवा पोलिसांच्या मदतीने भाईंदर पूर्वेकडील नवघर परिसरातून अटक केली आहे. प्रपेच्युअल रेमेडिओज (४२, रा. भाईंदर पूर्व) आणि जोआन रेमेडिओज (३२, रा. नवघर, भाईंदर पूर्व) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. यादोन्ही महिलांनी गोव्या राज्यात रहात असलेल्या फिर्यादी आणि त्यांचे पती यांना रिस इंटरनॅशनल सर्विसेस, मुंबईच्या मार्फत युरोपीय देशात नोकरी लावण्याचे आमिष दाखवले होते. त्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी आरोपींनी नोकरीची खोटी कागदपत्रे देऊन ४ लाख ८० हजार रुपये उकळले होते. पैसे दिल्यानंतर दोघीही गायब झाल्याने फिर्यादी महिलेने गोवा राज्यातील क्युपेम पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. दोन्ही महिला मीरा भाईंदर परिसरात असल्याची माहिती मिळाल्यावरून क्युपेम पोलिसांनी यामहिलांचा शोध घेण्यासाठी मीरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाकडे मदत मागितली होती. त्यानंतर गुन्हे शाखा काशिमीरा पथकाने क्युपेम पोलिसांच्या मदतीने शोध घेत प्रमेच्युअल रेमेडिओज आणि जोआना रेमेडिओज यादोघींना नवघर येथून अटक केली.

# भिवंडी शहरात बेकायदेशीरपणे चालणाऱ्या शाळांचे वीज आणि पाणी करणार खंडीत ?

**भिवंडी, दि. १७ : प्रतिनिधी**

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात परवानगीशिवाय चालणाऱ्या बेकायदेशीर शाळांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. महानगरपालिका प्रशासनाने घोषित केलेल्या १८ बेकायदेशीर शाळांव्यतिरिक्त आणखी ५ अनधिकृत शाळांची यादी देऊन परवानगीशिवाय चालणाऱ्या सर्व शाळांवर कारवाई करण्याची मागणी पीपल्स रिपब्लिकन पक्षाने केली आहे. १५ दिवसांत बेकायदेशीर शाळांवर कारवाई न केल्यास, पक्ष महानगरपालिका मुख्यालयासमोर आंदोलन करेल, असा इशाराही त्यांनी महानगरपालिका प्रशासनाला दिला आहे.याची दाखल घेत पालिकेने अवैध शाळांचे पाणी आणि वीज खंडित करण्याचे आदेश संबंधित विभागास दिले आहेत.शिक्षण विभाग,महाराष्ट्र आणि भिवंडी महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देऊन शहरात चालणाऱ्या अनधिकृत शाळा आणि महाविद्यालयांवर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी पीपल्स रिपब्लिकन पार्टी मायनॉरिटी विभागाचे भिवंडी शहर अध्यक्ष अब्दुल गनी खान यांनी केली आहे. त्यांनी निवेदनात म्हटले आहे की, महानगरपालिका प्रशासनाने काही महिन्यांपूर्वी शहरात सुरू असलेल्या १८ बेकायदेशीर शाळांची यादी जाहीर केली होती.तरी देखील शहरात बेकायदेशीर शाळा सुरू आहेत. या शाळांमुळे सरकारी शाळा बंद होत आहेत. या अनधिकृत शाळांना संरक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यांवर आणि या शाळा चालवणाऱ्यांवर कठोर आणि दंडात्मक कारवाई करावी,अशी मागणी आहे. तसेच या अनधिकृत शाळांमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त होत असल्याचा आरोप देखील त्यांनी केला आहे. या शाळांवर कारवाई न झाल्याने अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश घेतल्याने अनेक विद्यार्थ्यांची फसवणूक होत आहे. राजकीय दबाव किंवा हितसंबंधामुळे शिक्षण विभागाने शहरात बेकायदेशीरपणे चालणाऱ्या अर्धा डझनहून अधिक बेकायदेशीर शाळांची नावे यादीत समाविष्ट केलेली नाहीत. त्यामुळे या निवेदनात महापालिकेच्या यादीत समाविष्ट नसलेल्या ५ बेकायदेशीर शाळांची यादी देखील जोडली आहे.ब्राइट ज्युनियर कॉलेज, कल्याण रोड, व्हिक्टोरियन इंग्लिश स्कूल, गणेश सोसायटी, न्यू एरा इंग्लिश स्कूलची सेकंड ब्रांच, भारत कंपाउंड, एम एम पब्लिक स्कूल, भारत कंपाउंड, विवेकानंद इंग्लिश स्कूल, टेमघर अशी आहेत.हि पाच बेकायदेशीर शाळांची नावे महानगरपालिकेच्या यादीत समाविष्ट न केल्याबद्दल लेखी तक्रार महानगरपालिका शिक्षण विभाग आणि शिक्षण विभाग,महाराष्ट्र यांच्याकडे केली आहे. त्या सोबत राज्य शिक्षण मंडळ आणि महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने बेकायदेशीर शाळांच्या घोषित यादीत या अनधिकृत शाळांची चौकशी करून त्यांची नावे समाविष्ट करावी. तसेच या अनधिकृत शाळा तात्काळ बंद कराव्यात, अशी मागणीही त्यांनी केली आहे. तसेच अशा अनधिकृत शाळेचे मुख्याध्यापक आणि शाळा संचालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करून दंडात्मक कारवाई करावी. याबाबत महानगरपालिकेने दोन दिवसांत कोणतेही ठोस पाऊल उचलले नाही तर पीपल्स रिपब्लिकन पार्टी मायनॉरिटी विभागामार्फत निदर्शने करण्यात येतील,अशी माहिती गाणी खान यांनी दिली आहे.

## ट्रॉमा केअर सेंटरचे काम 95 टक्के काम पूर्ण

**पालघर, दि. १७ : प्रतिनिधी**

पालघर जिल्हयातील मनोर येथील अतिमहत्वाचे असलेले ट्रॉमा केअर सेंटर चे काम प्रगतीपथावर असून सदर ट्रॉमा केअर सेंटरचे काम 95 % पुर्ण करण्यात आलेले आहे. उर्वरीत काम लवकरात लवकर पुर्ण होण्याच्या दुष्टीकोनातून व यासाठी आवश्यक तो निधी तात्काळ उपलब्ध होण्यासाठी पालघर च्या जिल्हयाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांच्या माध्यमातून शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे. यासाठी त्यांनी शासनाचे आरोग्य सचिव विरेंद्र सिंग, सार्वजनिक आरोग्य विभाग मुंबई यांना याबाबतीत दिनांक 26/05/2025 रोजी पत्राव्दारे विनंती केलेली आहे. तसेच नंडोरे ता. पालघर येथील जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी आवश्यक असलेल्या निधीबाबत जिल्हा प्रशासनामार्फत पाठपूरावा करण्यात येत असून मनोर येथील ट्रॉम केअर व नंडोरे पालघर येथील जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी लवकरच उर्वरित निधी लवकरच प्राप्त होवून सदरची रुग्णालये रुग्णांच्या सेवेसाठी लवकरच उपलब्ध होतील असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी व्यक्त केला आहे.

## मेट्रोच्या लाखो रुपयांच्या साहित्यांची चोरी



**भाईंदर, दि. १७ : प्रतिनिधी**

नियोजित काशिगाव मेट्रो रेल्वेच्या बांधकाम साईटवरून तब्बल ८ लाख ७२ हजार रुपयांच्या साहित्यांची चोरी झाल्याचे उजेडात आले आहे. याप्रकरणी काशिमीरा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काशिगाव येथे मेट्रो रेल्वे स्टेशनचे काम सुरु आहे. त्यासाठी स्टेशन परिसरात लाखो रुपयांचे बांधकम साहित्य आणि बांधकामासाठी लागणारा माल ठेवण्यात आला आहे. पाच अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्यावेळी संधी साधून याठिकाणाहून तब्बल ८ लाख ७२ हजार रुपयांचे साहित्य चोरून नेले आहे.




# अलार्म लावताय..सावधान

सकाळी वेळेवर उठण्यासाठी अलार्म लावून झोपता का? स्नूझ केल्यामुळे तुमचा सकाळचा अलार्म दर ५ मिनिटांनी वाजतो का? असे असेल तर वेळीच सावध व्हा. कारण यामुळे उच्च रक्तदाबाचा धोका असतो. हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोकादेखील असतो.

तज्ज्ञांच्या मते, सकाळी अलार्म लावल्याने अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात. सकाळच्या अलार्मचा मेंदूवरही वाईट परिणाम होतो आणि त्याचा मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो.



वेगळे काही
**डॉ. प्रसन्न नेने**

**अलार्मचा शरीरावरचा परिणाम**

सकाळी अलार्मच्या आवाजाने जागे होणाऱ्यांना उच्च रक्तदाबाचा धोका जास्त असतो, असे 'यूव्हीए स्कूल ऑफ नर्सिंग'च्या अलीकडील संशोधनात आढळून आले आहे. संशोधनानुसार अलार्म लावून जागे होणाऱ्यांमध्ये उच्च रक्तदाबाचा धोका ७४ टक्के जास्त असतो. हे संशोधन ३२ लोकांवर करण्यात आले.

**अलार्म आणि उच्च रक्तदाबाचा संबंध?**

संशोधनात असे आढळून आले, की झोपलेल्या व्यक्तीला जबरदस्तीने जागे केले, तर त्याचा रक्तदाब वाढतो. अलार्मदेखील हेच करतो. अलार्म वाजल्यावर शरीराच्या प्रतिक्रियेमुळे रक्तदाब वाढतो. त्यामुळे पहाटे स्ट्रोक आणि हृदयविकाराचा धोका वाढतो.


# अंडाशयाच्या कर्करोगाचं प्रमाण वाढतंय

ओव्हेरियन (अंडाशय) कर्करोग महिलांच्या अंडाशयात होतो. अंडाशय हे स्त्रियांच्या प्रजनन अवयवांपैकी एक महत्त्वाचा अवयव आहे. अंडाशयात अंडी (स्त्रीबीज) तयार होतात. बरेचदा सुरुवातीच्या टप्प्यात अंडाशयाच्या कर्करोगाचे निदान होत नाही. वारंवार पोट फुगणे, ओटीपोटात वेदना, वारंवार लघवी होणे आणि आतड्यांच्या हालचालींमध्ये बदल ही होणे ही या कर्करोगाची लक्षणे आहेत. वय, कौटुंबिक इतिहास आणि बीआरसीए १ आणि बीआरसीए २ सारख्या अनुवांशिक घटकांमुळे हा कर्करोग होण्याची शक्यता वाढते.

**अनुवांशिकता असल्यास जोखीम अधिक**

काही महिलांमध्ये अनुवांशिकतेने बीआरसीए १ आणि बीआरसीए २ असे घटक आढळतात. त्यांना ओव्हरियन कॅन्सरचा धोका अधिक असतो. हे अनुवांशिक घटक पालकांपैकी एकाकडून संक्रमित होऊ शकतात.

स्तन किंवा अंडाशयाच्या कर्करोगाचा कौटुंबिक इतिहास असलेल्या महिलांनी अनुवांशिक समुपदेशन (जेनेटीक काऊन्सलिंग) सारख्या पर्यायाचा विचार करावा. बीआरसीए सारख्या अनुवांशिक घटकांबरोबरच लिंच सिंड्रोम, कोलन आणि एंडोमेट्रियल कर्करोगाशी संबंधित स्थितीदेखील अंडाशयाच्या कर्करोगाचा धोका वाढवते.




**पन्नास वर्षांवरील महिलांना जादा धोका**

बहुतेक वेळा अंडाशयाच्या कर्करोगाचे निदान ५० वर्षांपेक्षा अधिक वयाच्या महिलांमध्ये होते. वाढत्या वयाबरोबरच या कर्करोगाचा धोका वाढत जातो. ओव्हरियन, स्तन किंवा गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचा कौटुंबिक इतिहास असल्यास वेळोवेळी तपासण्या करून घ्यायला हव्यात. लवकर निदान झाल्यास वेळेवर उपचार मिळू शकतात आणि रुग्ण बरा होण्याची शक्यता वाढते. दुर्दैवाने अनेक प्रकरणांमध्ये निदानास विलंब होतो.

व्याधी विचार
**डॉ. मेघा दळे**

**कोणत्या चाचण्या कराव्यात?**

अंडाशयाच्या कर्करोगासाठी सध्या कोणतीही प्रभावी चाचणी उपलब्ध नाही. त्यामुळे त्याविषयी जागरूकता अधिक गरजेची आहे. नियमित पेल्विक तपासणी, उच्च-जोखीम प्रकरणांमध्ये अल्ट्रासाऊंड इमेजिंग आणि लक्षणांबाबत जागरूक राहणे वेळीच निदानास मदत करू शकते. कौटुंबिक इतिहास किंवा अनुवांशिक धोका असलेल्या महिलांनी नियमित तपासणी करावी आणि आपल्या डॉक्टरांशी याविषयी वेळोवेळी चर्चा करणे गरजेचे आहे. अधिक धोका असलेल्या महिलांसाठी, ट्रान्सव्हजायनल अल्ट्रासाऊंड आणि सीए-१२५ रक्त चाचण्यांचा सल्ला दिला जातो.

**धोका कमी करण्यासाठी...**

जीवनशैलीत अचूक बदल करणेदेखील या कर्करोगास प्रतिबंध करण्यास फायदेशीर ठरू शकते. वजन नियंत्रित राखणे, धूम्रपान टाळणे आणि शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहणे यामुळे या कर्करोगाचा धोका कमी होण्यास मदत होऊ शकते. कौटुंबिक इतिहासाबद्दल माहिती असणे आणि लक्षणे समजून घेणे हे त्या महिलांना वेळीच उपचार घेण्यास मदत करतील. म्हणूनच समाजात या कर्करोगाविषयी जागरूकता निर्माण करत अनुवांशिक तपासणी आणि जीवनशैलीत योग्य बदल केल्यास महिलांना कर्करोगाचा धोका कमी करता येतो.

# कमी झोपेमुळे येऊ शकतो हृदयविकाराचा झटका



उत्तम आरोग्य आणि दीर्घयुष्यासाठी झोप अतिशय महत्त्वाची ठरते. वयानुसार प्रत्येकाने आवश्यकतेइतकी झोप घेणे आवश्यक आहे. कामाचा ताण आणि कार्यपद्धतीशिवाय इतर अनेक कारणामुळे अनेकांना रात्री जागरण करण्याची सवय असते. गरज नसतानाही अनेक जण रात्री विनाकारण जागे राहतात. रात्री न झोपणे ही आरोग्यासाठी धोक्याची घंटा आहे. गेल्या काही वर्षांमध्ये कमी वयातही लोकांना हृदयविकाराच्या झटक्याने जीवाला मुकावे लागले. स्वीडनमधील उप्पसला विद्यापीठात केलेल्या एका अभ्यासातून सलग तीन रात्री झोप न घेतल्यास हृदयरोगाचा धोका वाढण्याची शक्यता जास्त असते, असा धक्कादायक गौप्यस्फोट झाला आहे. या संशोधनात निरोगी आणि तरुण लोकांचा विचार करण्यात आला होता. त्यांना कोणत्याही प्रकारच्या हृदयरोगाचा धोका नव्हता, तरीही झोपेच्या कमतरतेमुळे त्यांच्या शरीरात जळजळ आणि हृदयरोगाशी संबंधित बदल दिसून आले.

आरोग्यविशेष
**डॉ. दत्तात्रय मुळे**

**तरुणांनी सजग होण्याची आवश्यकता**

आतापर्यंतचे बहुतेक संशोधन मध्यमवयीन किंवा वयस्कर लोकांवर करण्यात आले आहे, पण या अभ्यासातून लहान वयात झोपेचा अभाव हृदयावर परिणाम करतो, असे सिद्ध झाले. म्हणून, तरुणांनी त्यांच्या झोपेबद्दल जागरूक राहणे अतिशय गरजेचे आहे.

# झोपेत लाळ गळते, पाच आजारांचे मिळतात संकेत

काही लोकांना रात्री झोपताना लाळ येते आणि बहुतेक लोक त्याकडे दुर्लक्ष करतात; परंतु कधीकधी ते अंतर्गत आजाराचे लक्षण असू शकते. रात्री झोपताना लाळ येणे ही एक सामान्य समस्या आहे. झोपेत नाक बंद झाल्यास, व्यक्ती तोंडातून श्वास घेऊ लागते. त्यामुळे तोंड उघडे राहते आणि लाळ वाहू लागते. थकवा, एका अंगावर झोपणे किंवा जास्त लाळ येणे हीदेखील याची कारणे असू शकतात. हे वारंवार किंवा रोज होत असेल तर ते गंभीर व्याधीचे लक्षण असू शकते.

**पाच आजार**

✼ **सायनुसायटिसः** सायनस म्हणजे चेहऱ्याच्या हाडांमध्ये हवेने भरलेली, नाकाशी जोडलेली पोकळी. सायनसमध्ये सूज येते किंवा संसर्ग होतो तेव्हा नाक बंद होते. त्यामुळे व्यक्ती तोंडातून श्वास घेऊ लागते. झोपेत तोंड उघडे असल्याने लाळ नियंत्रित होऊ शकत नाही आणि वाहू लागते. ही समस्या बराच काळ राहिली तर उपचार आवश्यक आहेत.

जाणून घ्या
**डॉ. कुंदन गायकवाड**



✼ **गॅस्ट्रोएसोफेजियल रिफ्लक्स रोग**

लाळ हे गॅस्ट्रोएसोफेजियल रिफ्लक्स या रोगाचे कारणदेखील असू शकते. गॅस्ट्रोएसोफेजियल रिफ्लक्स रोगात, पोटातील आम्ल घशापर्यंत वाढते. त्यामुळे तोंडात लाळेचे उत्पादन वाढते. झोपेत असताना तोंडातून ही जास्तीची लाळ बाहेर पडू शकते.

✼ **न्यूरोलॉजिकल समस्या**

पार्किन्सन्स, ब्रेन स्ट्रोक किंवा स्नायू विकारांसारख्या मज्जासंस्थेशी संबंधित समस्या तोंड आणि घशाच्या स्नायूंना कमकुवत करतात. यामुळे लाळ गिळण्याच्या प्रक्रियेत व्यत्यय येतो. त्यामुळे ती तोंडात जमा होते आणि बाहेर पडते.

✼ **झोपेच्या समस्या**

'स्लीप ॲप्निया'मध्ये झोपेदरम्यान नाकावाटे होणारा श्वासोच्छवास अधूनमधून बंद होतो. त्यामुळे व्यक्ती तोंड उघडे ठेवून श्वास घेऊ लागते. यामुळे तोंड कोरडे पडते आणि लाळेची समस्या निर्माण होते. हा एक गंभीर विकार आहे.

✼ **दात आणि हिरड्यांच्या समस्या**

तोंडात संसर्ग होतो, दात किडतात किंवा हिरड्या सुजतात, तेव्हा लाळ ग्रंथी अधिक सक्रिय होतात. त्यामुळे लाळेची निर्मिती वाढते.

# उच्च रक्तदाबामुळे मूत्रपिंडाचे नुकसान

उच्च रक्तदाबाचा परिणाम हृदयावर तर होतोच, पण त्यामुळे मूत्रपिंडांचेही नुकसान होऊ शकते. उच्च रक्तदाबाला 'सायलेंट किलर' म्हटले जाते. रक्तवाहिन्यांमधून वाहणाऱ्या रक्ताचा दाब ठरावीक प्रमाणापेक्षा अधिक असतो, तेव्हा उच्च रक्तदाबाची समस्या उद्भवते. यामुळे हृदयाला अधिक काम करावे लागते आणि शरीरातील रक्तवाहिन्यांवरील ताण वाढतो. उच्च रक्तदाबाचा कौटुंबिक इतिहास, आहारातील मीठाचे वाढते प्रमाण, शारीरिक हालचालींचा अभाव, लठ्ठपणा, धूम्रपान आणि तणाव ही उच्च रक्तदाबाची कारणे आहेत.

मधुमेह किंवा हार्मोनल विकारदेखील उच्च रक्तदाबास कारणीभूत ठरू शकतात. बहुतेक प्रकरणांमध्ये, उच्च रक्तदाबाची चटकन कोणतीही लक्षणे दिसून येत नाहीत. काही लोकांना डोकेदुखी, चक्कर येणे, नाकातून रक्त येणे किंवा अंधुक दृष्टी यासारखी समस्या सतावू शकते. परंतु, अनेकांना हे उच्च रक्तदाबामुळे होत असल्याचे माहीत नसते.



आरोग्य चर्चा
**डॉ. दिलीप शिरसाट**

**रक्तवाहिन्यांचे नुकसान**

वाढत्या दाबामुळे मूत्रपिंडातील रक्तवाहिन्यांचे नुकसान होऊ शकते. उच्च रक्तदाब हृदयाला हानी पोहोचवू शकतो, हे सगळ्यांना माहिती असले तरी मूत्रपिंडांवर त्याचा गंभीर परिणाम होतो हे फार कमी लोकांना माहिती आहे. रक्ताच्या शुद्धीकरणात मूत्रपिंडांची महत्त्वाची भूमिका असते. रक्तदाब जास्त काळ उच्च पातळीत राहतो तेव्हा मूत्रपिंडविकार सुरू होऊ शकतो किंवा मूत्रपिंड निकामी होण्याची शक्यता निर्माण होते.

**मूत्रपिंडातील रक्तवाहिन्यांना नुकसान**

उच्च रक्तदाबामुळे मूत्रपिंडातील लहान रक्तवाहिन्या अरुंद आणि कमकुवत होऊ शकतात. त्यामुळे शरीरातील टाकाऊ पदार्थ मूत्रावाटे बाहेर काढून टाकण्याची त्यांची क्षमता कमी होते. त्यामुळे शरीरात विषारी पदार्थ जमा होऊ शकतात.

**क्रॉनिक किडनी डिसीज**

दीर्घकालीन उच्च रक्तदाब हे 'सीकेडी'चे एक प्रमुख कारण आहे. जगण्यासाठी डायलिसिस आणि मूत्रपिंड प्रत्यारोपणाची आवश्यकता भासू शकते.

**काय काळजी घ्याल?**

उच्च रक्तदाबाचे व्यवस्थापन करून मूत्रपिंडांचे आरोग्य चांगले राखा. रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि मूत्रपिंडांचे संरक्षण करण्यासाठी, आहारातील मीठाचे सेवन मर्यादित करणे, संतुलित आहाराचे सेवन करणे, नियमित व्यायाम करणे, वजन नियंत्रित राखणे, धूम्रपान टाळणे आणि रक्तदाबाची औषधे घेताना डॉक्टरांच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे गरजेचे आहे. नियमित तपासणीमुळे रक्तदाबाची समस्या वेळीच ओळखण्यास आणि मूत्रपिंडाचे होणारे नुकसान टाळण्यास मदत होते. उच्च रक्तदाब असलेल्यांनी नेहमी सतर्क राहावे आणि पुरेपूर काळजी घ्यावी. नियमित रक्तदाब तपासणी करावी, औषधे घ्यावीत.

# कॉफीऐवजी काय प्याल?

तुमच्या दिवसाची सुरूवात कॉफीने होते का, तुम्ही दिवसभरात कॉफीचे चार ते पाच कप रिचवता का... सतत कॉफी पिण्याची ही सवय आरोग्यासाठी घातक ठरू शकते. कॅफेनचा अतिरेक घातक ठरू शकतो. यामुळे निद्रानाश, अस्वस्थता, उच्च रक्तदाब, पचनसंस्थेच्या तक्रारी अशा समस्यांना सामोरं जावं लागू शकतं. त्यामुळे दिवसाची सुरूवात कॉफीऐवजी दुसऱ्या पेयाने करावी. अशा काही पर्यायांविषयी...



आहारतंत्र

✼ ग्रीन टी हा अत्यंत आरोग्यदायी असा पर्याय आहे. ग्रीन टीमध्ये भरपूर अँटीऑक्सिडंट्स असतात. सकाळी कॉफीऐवजी ग्रीन टी पिता येईल. दोन जेवणांच्या मध्येही तुम्ही ग्रीन टी पिऊ शकता. ग्रीन टी हा अत्यंत आरोग्यदायी असा पर्याय आहे.

✼ विविध भाज्या आणि फळांपासून स्मूदी बनवता येईल. न्याहरीला स्मूदी पिता येईल. हळद घातलेलं दूध हा सुद्धा खूप चांगला पर्याय आहे.

# केशराच्या पाण्याचे लाभ

केशरमुळे पदार्थाला छान रंग येतो. केशराचा सुगंधही मन मोहवून टाकतो. केशर घातल्यामुळे मिष्ठान्नाला वेगळीच चव येते. केशरामुळे पदार्थाची लज्जतच वाढते असं नाही तर केशर खूप गुणकारीही आहे. आपला मूड लगेच चांगला होतो. कॅन्सरच्या पेशी मारण्याची क्षमताही केशरात असते. केशरामुळे शरीराचा दाह कमी होतो. इतकंच नाही तर केशरात अँटीऑक्सिडंट्ही असतात. केशराचं पाणी विविध आजारांवर गुणकारी



आयुर्वेद आणि विकार

अस्थमा, कफ, घसा खवखवणं, मळमळणं, उलट्या अशा विविध विकारांवर केशर खूपच प्रभावी ठरतं. केशरयुक्त पाणी प्यायल्याने बरेच लाभ मिळू शकतात. केशराच्या सहा ते सात कांड्या दहा मिनिटं गरम पाण्यात भिजवून ठेवा. हे पाणी नियमितपणे प्या. सकाळी रिकाम्या पोटी हे पाणी प्यायला हवं. केशरामधल्या काही घटकांमुळे ठरू शकतं. अर्थात केशरयुक्त पाणी पिण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घेणं योग्य ठरतं. केशरयुक्त पाणी प्यायल्यामुळे चेहऱ्यावर छान चमक येते. केसांचं आरोग्य राखण्यासाठीही केशराचं पाणी प्यायला हवं. महिलांना मासिकपाळी दरम्यान बराच त्रास होतो.

# सवयींचा अतिरेक टाळा

काही सवयी कितीही चांगल्या वाटल्या तरी त्यांचा अतिरेक नेहमीच घातक ठरतो. कोणत्या आहेत या सवयी? जाणून घेऊ.

शरीरातल्या जीवनसत्त्वांची कमतरता भरून काढण्यासाठी जीवनसत्त्वयुक्त औषधं घेतली जातात. पण या गोळ्यांचा अतिरेक आरोग्याला मारक ठरतो. जीवनसत्त्वांच्या अतिरेकामुळे कर्करोग होऊ शकतो. त्यामुळे कोणतीही औषधं डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेऊ नयेत.

आपण कुठे चुकतो?

दररोज एक ग्लास वाईन प्यायल्याने हृदयाचं आरोग्य चांगलं रहातं असं म्हणतात. पण निरोगी रहाण्यासाठी फक्त एक ग्लास वाईन प्यायला हवी. त्यापेक्षा अधिक वाईन आरोग्याला घातक ठरू शकते. वाईनच्या अतिरेकामुळे उच्च रक्तदाब, स्थूलपणा, पक्षाघात अशा समस्या निर्माण होऊ शकतात.




त्वचेतली घाण, मळ, मृत पेशी काढून टाकण्यासाठी एक्सफोलिएटिंग केलं जातं. या कृतीमुळे अँटीऑक्सिडंट्स तसंच इतर पोषक घटक रोमछिद्रांमार्फत त्वचेच्या आत शिरतात. स्क्रबिंगच्या माध्यमातून त्वचा स्वच्छ होते. पण स्क्रबिंग जास्त प्रमाणात केल्यास त्वचा कोरडी आणि खरखरीत होते.

नवसंशोधन

## सोशल मीडिया ठरतो घातक!

सध्या मुलांमध्ये स्मार्टफोन, सोशल मीडिया यांच्या वापराचं प्रमाण प्रचंड वाढलं आहे. बरीच मुलं तासनतास मोबाईल वापरताना दिसतात. मात्र सोशल मीडियाचा अतिवापर मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी मारक ठरू शकतो, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. सोशल मीडियामुळे वाढत्या वयाच्या तसंच किशोरवयीन मुलांमध्ये खाण्याशी संबंधित विकार बळावण्याची शक्यता असते, असा इशारा शास्त्रज्ञांनी दिला आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांच्या मोबाईल वापरावर नियंत्रण ठेवणं गरजेचं आहे. इंटरनॅशनल जर्नल ऑफ इटिंग डिसऑर्डर्स या जर्नलमध्ये हे संशोधन प्रकाशित झालं आहे. सध्या सोशल मीडियाची बरीच व्यासपीठं आहेत. मुलांची बरीच खाती असतात. मात्र एकापेक्षा अधिक सोशल मीडिया व्यासपीठांचा वापर लहानग्यांचं आरोग्य बिघडवू शकतो.



दंतारोग्य

## जास्त वेळ दात घासू नका!

बरेचजण बाल्कनीत उभं राहून किंवा फिरत फिरत दात घासतात. त्यांचं दात घासणं अर्धा-पाऊण तास सुरू असतं. मात्र अशा पद्धतीने दात घासणं अयोग्य आहे. अधिक काळ दात घासल्याने कोणतेही लाभ होत नाहीत. दातांवर जोरजोरात ब्रश घासल्यामुळे एनामेलचा थर कमी होत जातो. हिरड्या मागच्या बाजूला सरकरतात. यामुळे दंतविकार डोकं वर काढू शकतात. उगाचच दात घासत बसल्यामुळे खर्चिक उपचार करून घेण्याची वेळ येऊ शकते. १० ते २० टक्के प्रौढांचे दात याच कारणामुळे खराब होतात. म्हणूनच अधिक काळ दात घासण्याचा मोह टाळावा. दोन ते तीन मिनिटं दात घासणं पुरेसं असतं. उगाचच अर्धा तास दात घासत बसण्यात काहीच अर्थ नसतो हे लक्षात ठेवा.



केसांचं आरोग्य

## झिंक ठरतं प्रभावी

केस गळणं ही सर्वसाधारण समस्या बनून गेली आहे. महिलांसह पुरुषही केसगळतीने त्रस्त आहेत. केस गळण्यामागे बरीच कारणं असतात. अपुरी झोप, प्रदूषण, पोषक आहाराचा अभाव अशा असंख्य कारणांमुळे केस गळू लागतात. केसांच्या वाढीसाठी बऱ्याच पोषक घटकांची गरज असते. झिंक हा त्यापैकी एक पोषक घटक आहे. झिंकमुळे केसांचे टिश्यू बळकट होतात आणि वेगाने वाढ होऊ लागते. केसांच्या टिश्यूंचं नुकसान झिंकमुळे भरून निघतं. त्यामुळे केसांच्या वृद्धीसाठी आहारात झिंकचा समावेश असायला हवा. जवस, सुका मेवा, पूर्णधान्य, अंडी, दुग्धजन्य पदार्थ, डार्क चॉकलेट यामधून झिंक मिळू शकतं.





आजीबाईचा बटवा

## उपयोग मेथीचे

थंडीच्या दिवसात मेथी खायला हवी. मेथीच्या पानांमध्ये तंतूमय पदार्थ आणि भरपूर पोषक घटक असतात. थंडीत बरेचजण वजन कमी करतात. मेथीमध्ये खूप कमी कॅलरी असल्यामुळे आहारात मेथीचा समावेश करता येईल. मेथीच्या सेवनामुळे कोलेस्टरॉलचं प्रमाण कमी व्हायला मदत होते. कोलेस्टरॉल हृदयासाठी खूपच घातक असतं. मधुमेहींनी मेथीचं सेवन करायला हवं. मेथीमुळे रक्तातल्या शर्करेचं प्रमाण नियंत्रणात राहतं. मेथीमध्ये अँटीऑक्सिडंट्स तसंच बरीच जीवनसत्त्वं असतात. यामुळे त्वचेचं आरोग्य सुधारतं. या दिवसात त्वचा कोरडी पडते, फुटते. पण मेथीमुळे त्वचेचा तजेला टिकून रहायला मदत होते. मेथीमुळे पचनशक्ती सुधारते. पचनाच्या तक्रारी असतील तर मेथी खाता येईल. मेथीमधल्या फायबरमुळे अन्नपचन सुलभतेने होतं. त्यामुळे पचनाच्या तक्रारी असणाऱ्यांनी मेथीचं सेवन करायला हवं.





# सेन्सेक्स 213 अंकांनी कोसळला

## गुंतवणूकदारांचे 2.73 लाख कोटींचे नुकसान

**आयटी क्षेत्र वगळता इतर सर्व क्षेत्रीय निर्देशांकही घसरून बंद झाले. सर्वात मोठी घसरण फार्मा आणि हेल्थकेअर शेअर्समध्ये दिसून आली. याचे कारण म्हणजे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेली घोषणा.**

**मुंबई, दि. १७ प्रतिनिधी**

भारतीय शेअर बाजार मंगळवार १७ जून रोजी घसरणीसह बंद झाले. इस्रायल आणि इराणमधील वाढत्या तणावामुळे गुंतवणूकदारांच्या मनात चिंता वाढली. यामुळे बाजारात चौफेर विक्री झाली. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स २१२.८५ अंकांनी घसरून ८१,५८३.३० वर बंद झाला. तर निफ्टी ९३.१० अंकांनी घसरून २४,८५३.४० वर पोहोचला.

आयटी क्षेत्र वगळता इतर सर्व क्षेत्रीय निर्देशांकही घसरून बंद झाले. सर्वात मोठी घसरण फार्मा आणि हेल्थकेअर शेअर्समध्ये दिसून आली. याचे कारण म्हणजे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेली घोषणा ज्यामध्ये त्यांनी लवकरच औषध आयातीवर शुल्क लादण्याची चर्चा केली होती. याशिवाय धातू, बँकिंग आणि ऑटो निर्देशांकातही




अर्ध्या टक्क्यांहून अधिक घसरण झाली.

मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्समध्येही घसरण दिसून आली. निफ्टी मिडकॅप १०० आणि निफ्टी स्मॉलकॅप १०० निर्देशांक ०.७% ने घसरून बंद झाले. विश्लेषकांचा असा विश्वास आहे की पश्चिम आशियातील परिस्थिती शांत होईपर्यंत बाजारपेठेतील ही कमकुवतता कायम राहू शकते. त्याच वेळी गुंतवणूकदार यूएस फेडरल रिझर्व्ह बैठकीच्या निकालांची वाट पाहत आहेत, जे भविष्याची दिशा ठरवेल.

बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल आज १७ जून रोजी ४४७.७९ लाख कोटी रुपयांवर घसरले, जे मागील दिवशी म्हणजेच सोमवार, १६ जून रोजी ४५०.५२

**सेन्सेक्स 81,583**

**निफ्टी 24,853**

लाख कोटी रुपयांवरून कमी झाले. सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल २.७३ लाख कोटी रुपयांनी कमी झाले आहे. किंवा दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, गुंतवणूकदारांच्या संपत्तीत २.७३ लाख कोटी रुपयांची घट झाली आहे.

सेन्सेक्समधील ३० पैकी १० शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये टेक महिंद्राच्या शेअर्समध्ये सर्वाधिक १.३३ टक्के वाढ झाली. यानंतर, इन्फोसिस, एशियन पेंट, मारुती सुझुकी आणि टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसचे शेअर्स ०.५७ टक्क्यांवरून १.०१ टक्क्यांनी वाढून बंद झाले. सेन्सेक्समधील उर्वरित २० शेअर्स घसरून बंद झाले. यामध्ये सन फार्मा शेअर्समध्ये सर्वाधिक २.१८ टक्क्यांची घसरण झाली. दुसरीकडे, इटरनल, टाटा मोटर्स, बजाज फायनान्स आणि इंडसइंड बँकेचे शेअर्स १.४० टक्के १.९२ टक्के घसरले.

# ब्रिटनच्या गुप्तहेर संघटनेच्या प्रमुखपदी प्रथमच महिलेची निवड

**लंडन, दि. १७ वृत्तसंस्था**

जॉनर च्या चित्रपटाचे किंवा जेम्स बॉण्ड या कॅरॅक्टरच्या चित्रपटांचे चाहते असाल तर तुम्हाला MI6 ही इंग्लंड ची गुप्तहेर संघटना आहे, हे माहिती असेलच. सुरवातीच्या बॉण्डपटांमध्ये जेम्स बॉण्ड चा बॉस हा पुरुष असतो. नंतरच्या काळात ब्रिटनमध्ये जेंव्हा मार्गारेट थॅचर पंतप्रधान झाल्या, तेंव्हा बॉण्डपटांमध्ये जेम्स बॉण्ड ज्या गुप्तहेर संघटनेचा एजंट त्या MI6 ची प्रमुख M ही व्यक्तीरेखा स्त्री पात्र साकारू लागले. त्यानंतरच्या अनेक बॉण्डपटांमध्ये जुडी डेंच या अभिनेत्रीने ती भूमिका गाजवली. हे सगळे आठवण्याचे कारण म्हणजे आता पडद्यावर नव्हे तर प्रत्यक्षात MI6 या ब्रिटिश गुप्तहेर संघटनेचे नेतृत्व खरोखरच एका महिलेकडे आले आहे. या संघटनेच्या 115 वर्षांच्या इतिहासात हे प्रथमच घडले आहे.

सीक्रेट इंटेलिजेंस सर्व्हिस (MI6) ही ब्रिटनची गुप्तहेर संघटना ११५ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच एका महिलेच्या नेतृत्वाखाली काम करणार आहे. सीक्रेट इंटेलिजेंस सर्व्हिस (MI6) च्या प्रमुखपदी ब्लेझ मेट्रेव्हेली यांची नियुक्ती करण्यात आली आहे. २०२० पासून MI6 चे नेतृत्त्व रिचर्ड मूर करत होते. आता त्यांच्या जागी मेट्रेव्हेली या ऑक्टोबरपासून या



पदाची सुत्रे हातात घेतील.

ब्रिटिश पंतप्रधान केयर स्टारमर यांच्या कार्यालयाकडून रविवारी (दि.१५) यांची अधिकृत माहिती निवेदनाद्वारे देण्यात आली. युनायटेड किंग्डमला शत्रुकडून धोका वाढला आहे. शत्रूकडून पाण्यातून गुप्तचर जहाजे पाठवली जातात. तर कधी सायबर कट रचून हॅकरकडून सार्वजनिक सेवांमध्ये व्यत्यय आणला जातो. त्यामुळे गुप्तचर संघटनेचे काम पूर्वीपेक्षा अधिक वाढले आहे. त्यामुळे ब्लेझ मेट्रेव्हेली यांची प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. एजन्सीच्या ११५ वर्षांच्या इतिहासातील १८ व्या प्रमुख म्हणून त्या कार्यभार स्वीकारतील, असेही पंतप्रधान केयर स्टारमर यांनी निवेदनात म्हटले आहे.

ब्रिटिश पंतप्रधानांनी मावळते प्रमुख रिचर्ड मूर यांचेही पत्रकाद्वारे आभार व्यक्त केले, ' मी सर रिचर्ड मूर यांच्या समर्पित सेवेबद्दल त्यांचे आभार व्यक्त करतो. तसेच ब्लेझ मेट्रेव्हेली या आपल्या देशातील नागरिकांचे रक्षण करण्यासाठी जीवाची बाजी लावून काम करतील, असा विश्वास असल्याचेही त्यांनी निवेदनाद्वारे स्पष्ट केले.

### 'M' नव्हे तर 'C' म्हणून ओळखल्या जाणार मेट्रेवेली

इयान फ्लेमिंग लिखित जेम्स बॉण्ड च्या कादंबऱ्यामध्ये MI 6 च्या प्रमुखाला 'M' असे संबोधित केलं आहे तेच चित्रपटमधेही आले आहे. तथापि नवीन प्रमुख मेट्रेवेली यांना 'C' या आद्याक्षराने संबोधित केले जाणार आहे. 47 वर्षीय मेट्रेवेली या सध्या 'MI6' च्या डायरेक्टर जनरल म्हणून काम पाहत होत्या. त्यांना 'Q' म्हणून ओळखले जात होते. त्यांच्याकडे technology आणि innovations विभागाची जबाबदारी होती.

ब्लेझ मेट्रेव्हेली यांनी १९९९ मध्ये MI6 मधून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. फील्ड ऑफिसर म्हणून MI6 मध्ये भरती झाल्या. त्यांनी मध्यपूर्वीतील देश आणि UK मध्ये काम केले आहे. MI5 या देशांतर्गत गुप्तहेर संघटनेतही त्यांनी काम केले आहे.

# युवराज सिंग, हरभजन सिंग आणि सुरेश रैना तिघांची ईडीकडून चौकशी

**नवी दिल्ली, दि. १७ वृत्तसंस्था**

भारतीय संघाचे दिग्गज क्रिकेटपटू अडचणीत सापडले आहेत. भारताला विश्वविजेत्या बनवणाऱ्या संघाचे भाग असलेले युवराज सिंग, हरभजन सिंग आणि सुरेश रैना यांची ईडीकडून चौकशी करण्यात आली आहे. या तिघांव्यतिरिक्त अभिनेत्री उर्वशी रौतेलाचीही चौकशी करण्यात आली आहे.



हरभजन, युवराज आणि सुरेश रैना यांच्याबरोबर अभिनेता सोनू सूद आणि अभिनेत्री उर्वशी रौतेला यांचीही ईडीकडून चौकशी करण्यात आली आहे. यांच्यावर बेकायदेशीर ऑनलाइन बेटिंग ॲप्ससाठी जाहिराती केल्याचा आरोप आहे. वन एक्स बेट, फेयरप्ले, पारिमॅच आणि लोटस365 सारख्या बंदी घातलेल्या प्लॅटफॉर्मशी जाहिराती करण्याबाबत प्रश्न विचारण्यात आले आहेत. सध्या या बेकायदेशीर ऑनलाइन बेटिंग ॲप्सचा तपास केला जात आहे.

वन एक्स बेट सारख्या बंदी घातलेल्या प्लॅटफॉर्मच्या जाहिरातीमध्ये या सेलिब्रिटींच्या सहभागाबाबत चौकशी करण्यात आली आहे. बंदी घातलेल्या या ऑनलाईन बेटिंग ॲप्सबाबत आधीच चौकशी सुरू आहे, त्याबाबतच यांना प्रश्न विचारण्यात आले. हे प्लॅटफॉर्म '1xbet' सारखी प्रतिनिधी म्हणून इतर नावांचा वापर करत होते ज्यात वेब लिंक्स आणि QR कोड होते जे युजर्सना बेकायदेशीर बेटिंग प्लॅटफॉर्मवर रिडायरेक्ट करतात आणि जे कायद्यांचे उल्लंघन आहे.

ईडीने म्हटले आहे की या प्लॅटफॉर्मने स्किल बेस्ड गेम असल्याचे सांगितले होते, परंतु त्यांनी बनावट अल्गोरिदम वापरले होते. ज्यामुळे आता हे ॲप्स भारतीय कायद्यांनुसार जुगार खेळ असणारे आहेत. युवराज सिंग, हरभजन सिंग आणि सुरेश रैना यांनीही '1xbet' प्लॅटफॉर्मसाठी जाहिरात केली आहे, त्यानंतर या तिन्ही दिग्गजांची चौकशी करण्यात आली आहे.

# एअर इंडियाच्या अमृतसरहून जाणाऱ्या विमानाचे उड्डाण रद्द

## लंडनला जाणारे प्रवासी खोळंबले

**अमृतसर, दि. १७ वृत्तसंस्था**

अहमदाबादहून लंडनला जाणारं एअर इंडियाचं विमानाचं उड्डाण रद्द झालं आहे. १२ जून रोजी लंडनला जाणारं एअर इंडियाचं विमान कोसळलं आणि २४१ प्रवाशांचा मृत्यू झाला. यानंतर अवघ्या सहा दिवसांनी एअर इंडियाचं अहमदाबाद लंडन हे विमान रद्द झालं आहे. तांत्रिक बिघाडामुळे हे विमान रद्द करण्यात आलं आहे अशी माहिती मिळते आहे. दरम्यान या प्रकरणी प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे.

दरम्यान लंडनला जाणारे प्रवासी चांगलेच संतापले आहेत. एअर इंडियाने विमान प्रवास करुच नका, असं एका प्रवाशाने सांगितलं. तर वसंत बसाणी यांनी सांगितलं मी सकाळीच इथे आलो आहे. मला माझ्या मुलीकडे लंडनला जायचं होतं. आधी मेसेज आला की तुमचं विमान ३ वाजता असेल. चेक इन सुरु केलं आणि त्यानंतर आता सांगण्यात येतं आहे की विमानाचं उड्डाण रद्द झालं आहे. याचं काहीही कारण सांगण्यात आलेलं नाही. बाकीच्या विमानांची उड्डाणं होत आहेत. मात्र एअर इंडियाचं विमानाचं उड्डाण रद्द झालं आहे. कुणी धड काही सांगायलाही तयार नाही. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरवत आहेत. आम्ही ६ ते ७ हजार रुपये खर्चून आलो आहोत. आता आम्ही काय करायचं? असं त्यांनी म्हटलं आहे.

Air India चं AI 159 हे विमान दुपारी १ वाजून १० मिनिटांनी लंडनला जाण्यासाठी उड्डाण घेणार होतं. मात्र तांत्रिक बिघाडामुळे या विमानाचं उड्डाण रद्द करण्यात आलं. हे विमान रद्द झाल्याने त्याचा फटका २०० प्रवाशांना बसला आहे. चेक इन सुरु असताना विमानाचं उड्डाण रद्द झाल्याने आणि कुठलीही माहिती नीट दिली जात नसल्याने प्रवासी संतापले आहेत.

# रघुवंशी हत्या प्रकरण: पोलिसांनी केला पूर्ण सीन रिक्रिएट

**शिलाँग, दि. १७ वृत्तसंस्था**

मेघालयातील राजा रघुवंशी हत्या प्रकरणाच्या तपासाला आता वेग आला आहे. राजा रघुवंशी हत्या प्रकरणाचा घटनाक्रम समजून घेण्यासाठी शिलाँग पोलीस सोहराच्या वेसाडोंग फॉल्समध्ये पोहोचले होते. आरोपींनी राजा कसे संपवले याचा पूर्ण सीन रिक्रिएट करण्यात आला. यावी फॉरेन्सिक टीम देखील घटनास्थळी उपस्थित होती. सोनम रघुवंशीसह सर्व आरोपींना गुन्ह्याच्या ठिकाणी नेण्यात आले होते. यावेळी पोलिसांनी आरोपी सोनम रघुवंशी आणि इतर तीन आरोपींनी १८ मिनिटांत एवढी मोठी घटना कशी घडवली हे जाणून घेतले.

पोलीस यंत्रणाच्या कडक सुरक्षेत आरोपींना राजा रघुवंशीची हत्या करण्यात आलेल्या ठिकाणी नेण्यात आलं. आरोपींनी राजाचा मृतदेह मेघालयातील इस्ट खासी हिल्स जिल्ह्यातील चेरापुंजी येथे एका खड्ड्यात फेकला होता. संपूर्ण घटनाक्रम एसडीआरएफ आणि पोलिस पथकांच्या उपस्थितीत रिक्रिएट करण्यात आला. सोनमला येथे वेगळ्या वाहनातून आणण्यात आले तर इतर तीन आरोपींना दुसऱ्या वाहनातून आणण्यात आले. हत्येच्या दिवशी राज शिलाँगमध्ये उपस्थित



नव्हता, त्यामुळे त्याला घटनेच्या ठिकाणी नेण्यात आले नाही.

शिलाँग पोलिसांनी २३ मे रोजी दुपारी २:१८ वाजता १८ मिनिटांत राजाची हत्या करून त्याचा मृतदेह फेकून दिल्याचा दावा केला होता. आरोपींना घटनास्थळी नेऊन ते कोणत्या मार्गाने वर आले, सगळ्यात आधी हल्ला कोणी केला, राजाची हत्या कशी झाली, मृतदेह कसा उचलला आणि खाली फेकला गेला आणि नंतर तेथून कसे पळून गेले हे समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. यातून पोलिसांना या घटनेबद्दलच्या अनेक प्रश्नांची उत्तरे मिळू शकतात.

हत्येच्या दिवशी गुन्ह्याच्या ठिकाणी पोहोचल्यानंतर राजाला लघुशंका करण्यासाठी जायचं होतं. तो दरीत लघवी करू लागला. त्याचवेळी सोनम आणि तीन आरोपी तिथे पोहोचले. त्यावेळी सोनम मोठ्याने ओरडून आरोपींना त्याला मारण्यास सांगत होती. त्यानंतर तिन्ही आरोपींनी धारदार शस्त्राने राजावर हल्ला केला. राजाची हत्या केल्यानंतर चौघांनी राजाचा मृतदेह उचलून सेल्फी पॉइंटवरून खाली फेकून दिला. लग्नानंतर राजा आणि सोनम २३ मे रोजी येथून बेपत्ता झाले होते. पोलिसांना २ जून रोजी राजाचा मृतदेह सापडला होता. सोनमने तिचा कथित प्रियकर राज कुशवाह आणि तीन मित्रांसह शिलाँगमध्ये संपूर्ण घटनेचा कट रचला होता.

# अक्षरांचा जादूगार

प्रत्येक शुभकार्याची सुरुवात श्री गणेशाच्या शुभ आशिर्वादाने व्हावी अशी प्रत्येकाची इच्छा असते. तुमच्या नावातच श्री गणेशाचं नाव साकारलं तर...नवल वाटेल ना? मुंबईतील अभिषेक चिटणीस हा कलाकार फक्त दोन मिनिटांमध्ये तुम्ही सांगितलेल्या कोणत्याही नावाचा गणपती साकार करतो. त्यानं आत्तापर्यंत 20 ते 25 हजार अक्षर गणेश साकारले आहेत. मुंबईसह राज्यात माघी गणेशोत्सवाला मोठ्या धुमधडाक्यात सुरुवात होत आहे. संपूर्ण महाराष्ट्राचे लाडके दैवत म्हणजे गणपती. सर्व चौशष्ट कला गुणांचा तो अधिपती असल्याने त्याला गुणपती असेही एक नाव आहे. बाप्पांना आपण विविध नावारूपाने संबोधतो. काळाबरोबर अपडेट झालेले गणपतीबाप्पा 'अक्षर गणेश' या कला प्रकारातून भक्तांना आकर्षित करत आहेत. मुंबईतल्या परळ भागात राहाणारा अभिषेक अक्षरांच्या माध्यमातून गणपती बाप्पा साकारतो. तो गेल्या 10 वर्षांपासून अक्षर गणेश




साकारत आहे. राजकीय नेत्यांपासून हिंदी, मराठी अभिनय क्षेत्रातील कलाकारांना देखील अभिषेकने साकारलेल्या कलाकृतीची भूरळ पडलीय. क्रिकेटचा देव मानला जाणारा मास्टरब्लास्टर सचिन तेंडुलकर, राजकीय नेत्यांमध्ये राज ठाकरे, अजित पवार यांनी देखील अभिषेकच्या कलेचे कौतुक केले आहे. गायिका आशा भोसले, अभिनेत्री आलिया भट्ट, अभिनेता रितेश देशमुख, नृत्यदिग्दर्शक रेमो डिसुझा, धर्मेश यांना प्रत्यक्ष भेटून त्याने अक्षर गणेश कलाकृती दिली आहे.ही कला साकारताना अनेक अडचणींवर मात करत आपल्या घरच्यांच्या पाठबळामुळे अभिषेक जास्तीत जास्त लोकांपर्यंत ही कला पोहचवण्याचा प्रयत्न करणार आहे. तसेच गरजू विद्यार्थ्यांना ही कला मोफत प्रशिक्षण देणार असल्याचं ही त्यानं सांगितलं.एकूणच अभिषेक सारखा अक्षरांचा जादुगार हा अनेकांच्या नावातून अक्षर गणेशा सारखी कलाकृती साकारत महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशभरातील गणेश भक्तांच्या मध्ये एक लोकप्रिय कलाकार म्हणून प्रसिध्द झालेला आहे. अभिषेकची हीच आगळीवेगळी अक्षरकला भविष्यात वृद्धीगत होवो याच त्याला शुभेच्छा.

**मुलखावेगळी माणसं**

**लोकमानस**

## मुंबईच्या आरव अग्रवाल आणि इश्मीत कौरचे आकाश एज्युकेशनल अंतर्गत नीट परीक्षेत यश




देशातील आघाडीची टेस्ट प्रिपरेशन संस्था असलेल्या आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडने अभिमानाने जाहीर केले की नेरुळ,

**दखल**

मुंबईच्या आरव अग्रवालने NEET UG 2025 मध्ये ऑल इंडिया रँक 10 (AIR 10) मिळवली असून दादरच्या इश्मीत कौरने AIR 85 मिळवली आहे. हे अपूर्व यश विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे, शैक्षणिक शिस्तीचे आणि ऐइएसएल कडून मिळालेल्या जागतिक दर्जाच्या मार्गदर्शनाचे प्रतीक आहे. हे निकाल 14 जून रोजी नॅशनल टेस्टिंग एजन्सी कडून जाहीर करण्यात आले.विद्यार्थी ऐइएसएल च्या क्लासरूम प्रोग्रामचा भाग होते, जो खास NEET सारख्या कठीण वैद्यकीय प्रवेश परीक्षेची तयारी करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय ऐइएसएल द्वारे मिळालेल्या ठोस शैक्षणिक पाया, संकल्पनांची स्पष्टता आणि सातत्यपूर्ण व शिस्तबद्ध अभ्यास पद्धतीला दिले.

"या संपूर्ण प्रवासात मार्गदर्शन केल्याबद्दल आम्ही आकाशचे अत्यंत आभारी आहोत. संरचित अभ्यासक्रम, तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन आणि वैयक्तिक मेंटरिंगमुळे आम्हाला अवघड विषय अल्प वेळेत आत्मसात करता आले. ऐइएसएल नसते तर हे यश शक्य झाले नसते," असे विद्यार्थ्यांनी सांगितले.ऐइएसएलचे चीफ अकॅडेमिक आणि बिझनेस हेड डॉ. एच. आर. राव यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत "NEET UG 2025 मधील विद्यार्थ्यांच्या यशाचा अभिमान असल्याचे सांगितले.

## जगातील सर्वात मोठे रिजिड प्लास्टिक सर्कुलर इकॉनॉमी समिट मुंबईत संपन्न




इंजेक्शन, ब्लो मोल्डिंग, पीईटी आणि रीसायकलिंगवरील एलिटप्लसच्या वार्षिक ग्लोबल सिग्नेचर समिटची १० वी आवृत्ती, वाढ आणि सर्कुलरिटीवर लक्ष केंद्रित करून भारताच्या रिजिड प्लास्टिक क्षेत्रासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे.

**नोंद**

एलिट प्लस १० वी आवृत्तीचे आयोजन अलीकडेच मुंबईतील जियो वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, येथे यशस्वीरित्या संपन्न झाले. संपूर्ण प्लास्टिक उद्योगाकडून या समीटचे जोरदार यश म्हणून कौतुक केले जात आहे कारण ते या क्षेत्रातील जागतिक स्तरावरील सर्वात मोठे शिखर म्हणून आपले स्थान आणखी मजबूत करते. या समिटला भारत सरकारच्या रसायने आणि खते मंत्रालयाच्या रसायने आणि पेट्रोकेमिकल्स विभाग (डीसीपीसी) द्वारे पाठिंबा आहे. शिखर परिषदेत १० देशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ४५०+ संघटनांमधील १०५० हून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते.

भारत विकसित होत असलेल्या नवीन जागतिक आर्थिक व्यवस्थेत स्थान मिळवत असताना, शिखर परिषदेने एक महत्त्वाचा उद्योग प्रवेगक म्हणून काम केले .दोन दिवसांत, चर्चांमध्ये प्रमुख भाषणे, ८ व्यवसाय सत्रे आणि ५ पॅनेल चर्चा बाजार गतिमानता, शाश्वत मोल्डिंग, नवीन अनुप्रयोग, तांत्रिक प्रगती, ब्रँड मालकांच्या अपेक्षा, पीईटी नवोपक्रम आणि पुनर्वापर तंत्रज्ञानापासून ते किंमत गतिमानता, ईपीआर धोरणे आणि वर्तुळाकार अर्थव्यवस्था सक्षम करणाऱ्यांपर्यंत यासारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा झाली.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com


# माफी मागायला सांगणे हे हायकोर्टाचे काम नाही

## सुप्रीम कोर्टाने 'ठग लाइफ' बंदी प्रकरणात खडसावले

**नवी दिल्ली, द. १७ वृत्तसंस्था**

माफी मागायला सांगणं हे हायकोर्टाचं काम नाही? सुप्रीम कोर्टानं कर्नाटक प्रकरणी खडसावलं कमल हासनच्या ठग लाईफ या सिनेमाचं प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं आहे. या प्रकरणी कर्नाटकात सिनेमावर जी बंदी घालण्यात आली त्या प्रकरणी कर्नाटक उच्च न्यायालय आणि सरकारला खडे बोल सुनावले आहेत. अभिनेत्याला माफी मागायला सांगणं हे न्यायालयाचं काम नाही असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. अभिनेते कमल हासन यांनी प्रमोशनच्या दरम्यान वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. त्यानंतर त्यांना माफी मागा अन्यथा सिनेमा कर्नाटकात प्रदर्शित होणार नाही असं बजावण्यात आलं. ज्यानंतर त्यांनी कर्नाटक उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र न्यायालयाने जेव्हा हासन यांना खडे बोल सुनावले तेव्हा त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

कमल हासन यांच्या ठग लाइफ सिनेमावर घालावी अशी मागणी कर्नाटकात झाली. याविरोधात कमल हासन यांनी एक याचिका दाखल केली होती. या याचिकेवर न्यायमूर्ती जास्टिस नागप्रसन्ना यांनी म्हणाल्या होत्या की कुठल्याही नागरिकांच्या भावना दुखावण्याचा अधिकार कुणालाच नाही. आपल्या देशाची रचना प्रांतवार



झालेली आहे ती भाषेच्या आधारावर झाली आहे. एखादी पब्लिक फिगर असणारी व्यक्ती अशा प्रकारे बोलत असेल तर काय होईल? कुठलीच भाषा दुसऱ्या भाषेपासून जन्माला आलेली नाही. या सगळ्याने फक्त वातावरण बिघडवण्याचं काम केलं आहे. या बदल्यात लोक काय म्हणत आहेत? कमल हासन यांनी माफी मागावी. यात काय चूक आहे? असा सवाल त्यांनी केला होता. कमल हासन काही इतिहासकार नाहीत. भाषेचे जाणकार नाहीत. कमल हासन यांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला कारण त्यांना त्यांचं आर्थिक हित जपायचं आहे. जे काही घडलं त्यानंतर कमल हासन यांनी माफी मागायला हवी होती. कमल हासन असो किंवा इतर कुणीही असो लोकांच्या भावना दुखावण्याचा अधिकार कुणालाच नाही असंही न्यायालयाने म्हटलं होतं. ज्यानंतर कमल हासन यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

# टेस्ट क्रिकेटमध्ये होणार ऐतिहासिक बदल

## पाच नाही तर चार दिवसांचा असेल कसोटी सामना

**दुबई, दि. १७ वृत्तसंस्था**

आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप आल्यापासून कसोटी क्रिकेटचा थरार आणखी रोमांचक झाला आहे. आता आपल्याला संघांमध्ये रोमांचक लढाई



पाहायला मिळते. पण, ते अधिक मनोरंजक बनवण्यासाठी, आयसीसी नवा फॉर्म्युला घेऊन येणार आहे. एका अहवालानुसार, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद 2027-29 वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेत लहान देशांसाठी चार दिवसांच्या कसोटी सामन्यांना मान्यता देणार आहे, परंतु भारत, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड हे तिन्ही देश एकमेकांविरुद्ध पारंपारिक पाच दिवसांचे सामने खेळतील. सामन्यांची संख्या एका दिवसाने कमी करण्याचा निर्णय एका महत्त्वाच्या आणि मोठ्या बदलाकडे निर्देश करत आहे.

'गेल्या आठवड्यात लॉर्ड्स येथे झालेल्या डब्ल्यूटीसी फायनलमध्ये झालेल्या चर्चेदरम्यान, आयसीसी अध्यक्ष जय शाह यांनी 2027-29 डब्ल्यूटीसी सायकलसाठी चार दिवसांच्या कसोटी सामन्यांना पाठिंबा दर्शविला आहे. अंतिम सामन्यादरम्यान यावर चर्चा करण्यात आली जेणेकरून नियम वेळेत मंजूर करता येईल आणि त्यासाठी नियम बनवता येतील.

त्यात म्हटले आहे की, 'इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि भारत यांना अजूनही ॲशेस, बॉर्डर-गावसकर ट्रॉफी आणि अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफीसाठी पाच दिवसांच्या कसोटी मालिकेत खेळण्याची परवानगी असेल. अँडरसन तेंडुलकर ट्रॉफी शुक्रवारी हेडिंग्ले येथे इंग्लंड आणि भारत यांच्यातील पहिल्या कसोटी सामन्याने सुरू होईल. भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांची कसोटी मालिका 20 जूनपासून सुरू होणार आहे.

अहवालानुसार, 'वेळ आणि खर्चामुळे अनेक लहान देश कसोटी सामन्यांचे आयोजन करण्यास टाळाटाळ करतात, परंतु चार दिवसांच्या क्रिकेटकडे वाटचाल केल्याने संपूर्ण तीन कसोटी मालिका तीन आठवड्यांपेक्षा कमी वेळात खेळता येईल.'

अहवालात म्हटले आहे की, 'चार दिवसांच्या कसोटी सामन्यांमध्ये वेळेचा अपव्यय कमी करण्यासाठी, एका दिवसातील खेळण्याची वेळ दररोज किमान 98 षटके केली जाईल. सध्याच्या पाच दिवसांच्या कसोटीत, एका दिवसात जास्तीत जास्त 90 षटके टाकली जातात.






**बोरा बाजार फोर्ट, मंगेश शेनाय स्ट्रीट फोर्ट या ठिकाणी साफसफाई केल्यानंतरही कचऱ्यांचे ढिगारे उचलण्यात आले नाहीत. हे त्याचे हे विदारक फोटो या ठिकाणी आम्ही दिलेले आहेत. अशा प्रकारची समस्या आपल्या आसपास, आपल्या गावामध्ये, कोणत्याही प्रभागांमध्ये किंवा कोणत्याही वार्डामध्ये असेल. तर दैनिक महासागर आपल्या समस्यांना वाचा फोडणार आहे... आपण आमचे बातमीदार बनू शकता...**

**संपर्क क्रमांक - 9137362297**

**संपर्काची वेळ सकाळी 10.30 ते 12.30 - दुपारी 4.30 ते 5. 30 आपली समस्या घेऊन दिलेल्या वेळेतच अवश्य कॉल करा.**

महासागर PALGHAR
RNI No.: MAHAMAR/2014/62313
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 208/B, Lokmanya Building, Near Taluka Panchayat Samiti Office, Palghar(W)-401404, **Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK, Executive Editor- Shashi Karpe**

महासागर पालघर
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून २०८/बी, लोकमान्य बिल्डिंग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर पालघर (प.) ४०१४०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक : **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) कार्यकारी संपादक - शशी करपे (मो.नं. ९८९२९६८७२५) Email : mumbaimahasagar@gmail.com**
RNI No.: MAHAMAR/2014/62313